म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय वा-वा-
दा.क्र. १६३६५

IRBK-0116365

IRBK-0116365

म. ग्रं. स. ठाण
विषय बा. वा.
क्र. १६३६५



# चिंगी


— ना. धों. ताम्हनकर

१६२६४

१३/१/८६

११-९१

# चिंगी



लेखक

ताम्हनकर

IRBK-0116365
IRBK-0116365

किंमत ५ रुपये

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

खेळगड्यांचे

खेळगडी

कांका पालवणकर

ह्यांस

सप्रेम

समर्पण

ना. धों. ताम्हनकर

* * * * * * * * * * * * * * * * * * * * *

© केशव भिकाजी ढवळे

तिसरी आवृत्ती : १९७४

*

मुद्रक

सर्वदमन शंकर आजगांवकर

मुंबई वैभव प्रेस,

गिरगाव, मुंबई ४

*

प्रकाशक

धनंजय बाळकृष्ण ढवळे

केशव भिकाजी ढवळे

गिरगाव, मुंबई ४

# अनुक्रम


| | |
|---|---|
| चिंगी | ५ |
| चिंगीचा आज्ञाधारकपणा ! | १८ |
| चिंगीचा पुनर्जन्म | ३० |
| चिंगीचे पत्रलेखन | ४१ |
| एका कामात चार कामे | ४३ |
| लग्नघरात चिंगी | ५२ |
| चिंगीचा प्रवासी विक्रम | ६६ |
| उलटे बक्षीस | ७५ |
| छोट्या पंढरीची यात्रा | ८४ |
| चिंगीचा पराक्रम | ९० |
| चिंगीचे सीमोल्लंघन | ९५ |

# चिंगी

**गणूकाकांची** बदली होऊन ते पुण्याला गेले आणि आमच्या वाड्याच्या मालकांनी रिकाम्या झालेल्या रस्त्याकडील गाळ्यावर ‘ भाड्याने देणे आहे ’ अशी पाटी लावली, तेव्हा आम्हाला कसंसंच वाटायला लागलं. सलग चारपाच वर्षं शेजारी राहिल्यामुळे आमचा व गणूकाका आणि मंडळींचा चांगलाच घरोबा जमला होता. कामावरून घरी येताच, ‘काय वैनी, दादा आले की नाही अजून ?’ अशी काकांची हाक यायची आणि कधी मी आधी आलो तर मीही सरूकाकूंना ‘काकांना आज उशीर का लागला ? ’ असं विचारायचा. काकांनी काही खाऊ आणला तर आपल्या मनी-नन्यांना द्यायच्या अगोदर ते आमच्या सुमा-बापूंना हाक मारायचे आणि सरूकाकू कथेला निघाल्या, की हिला घेतल्याशिवाय जायच्या नाहीत. काकूंच्या खणापातळांची खरेदी हिच्या पसंतीशिवाय व्हायची नाही आणि हिची पातळंपोलकीही सरूकाकूंनीच मंजूर केलेली असायची. दोघांपैकी कुणाकडेही गोडधोड झालं, की एकामेकांकडे पोचतं व्हायचं. आम्हाला कुठं गावाशिवाला जायचं झालं, की सुमा-बापूंना काका-काकूंच्या स्वाधीन करून आम्ही खुशाल जात होतो आणि एकदा सरूकाकू भावजयीच्या बाळंतपणासाठी गेल्या, तेव्हा काका आणि त्यांची मुलं संकोच न करता आमच्याकडे जेवली. शेजाऱ्यांत मुलांच्या पायी बेबनाव होतो असं आम्ही पुष्कळदा पाहातो. सुमतिबाई आणि

ताराबाई या शेजारणी आपल्या मुलांच्या खेळांतल्या मारामारीवरून एकमेकींशी भांडल्या आणि आता त्या कायमच्या दावेदारणी होऊन एकमेकींना पाण्यात पाहातात, हे समोरच्या आळीतलं उदाहरण आमच्या डोळ्यांपुढं आहे. पण गणूकाका आणि सरूकाकूंच्या तोंडून अशा कारणामुळं रागाचा शब्द चुकूनसुद्धा कधी निघाला नाही. त्यांच्या नि आमच्या मुलांची भांडणं काय कधी झालीच नाहीत? शक्य तरी कसं आहे हे? मुलं खेळायला एकत्र यायची, भांडायचीही, फार काय, चावण्या बोचकरण्यापर्यंत मजल जाऊन त्यांच्या कागाळ्या वडील मंडळीकडे यायच्या. पण मनीनं सुमाची कागाळी केली, की सरूकाकू म्हणायच्या, 'गप्प बस तू. सुमाचं घर उन्हात बांधायला सांगते मी दादांना.' आणि बापूनं, बन्यानं पतंग फाडल्याची तक्रार माझ्याकडे आणल्यावर मी म्हणायचा, 'हात्तिच्या! एवढंच ना! मी उद्या तुम्हा दोघांनाही नवे पतंग आणून देतो. म्हणजे तुम्हांला भांडायला नको त्याच्यासाठी.'

मुलांच्या भांडणात पडून मोठ्यांनी हाणामारी करायची म्हणजे मुलांपेक्षाही आपण अडाणी आहो असं सिद्ध करून देण्यासारखं आहे, हे गणूकाकांचं म्हणणं आम्हांला पूर्णपणे पटलेलं होतं.

थोडक्यात सांगायचं, म्हणजे गणूकाकांचा शेजार हा आम्हांला लाभलेला एक ईश्वरी प्रसाद आहे असं आम्हांला वाटत होतं आणि हा शेजार दुरावल्यामुळं आमची मनं अगदी भारावून गेली होती. काका-काकू पुण्याला जायला निघाली, तेव्हा दरवाजापर्यंत पोचवायला जाणंसुद्धा माझ्याच्यानं झालं नाही. काकूकाका नजरेआड होताना मला हुंदका आवरणार नाही आणि भररस्त्यावर मला रडताना पाहून लोक हसतील, या भयानं मी घरातच बसून राहिलो. ही मात्र मोटार दिसेनाशी होईपर्यंत नाकडोळे टिपीत आणि हातानं काकूंना निरोप

देत दारात उभी होती. सुमा-बापूंचे खेळगडी दुरावल्याबद्दल त्यांच्याही पोटात कालवाकालव चालू होती, पण तिला शब्दावाटे बाहेर काढण्याचं त्यांना साधत नव्हतं.

मंडळींना निरोप देऊन घरात आल्यावर थोड्या वेळानं सुमा माझ्याकडे येऊन म्हणाली,

" काकांची बदली झाली तर काकूंनी आणि बनूनं का म्हणून हो जायचं ? ज्याची बदली होईल त्यानं एकट्यानं जावं वाटलं तर. "

मला मौज वाटली सुमाच्या प्रश्नाची. तिला काय उत्तर द्यावं हे मला सुचेना एकदम. काहीतरी बोलायचं म्हणून मी म्हणालो,

" सुमे, काका गेले बदली झाली म्हणून, मनू-बनू गेली तुम्ही त्यांच्याबरोबर भांडता म्हणून. परवा तू मनूची बाहुली हौदात टाकलीस म्हणून रागावलीय ती तुझ्यावर...."

" खरंच ? " सुमाचा घसा दाटून आला. तिचे डोळे पाण्यानं डबडबले. ती अडखळत म्हणाली,

" दादा, मी आता पुन्हा कध्धी कध्धी भांडायची नाही मनूबरोबर. तिला घेऊन या ना परत. मी तिला माझ्या भावल्या नि बोळकीसुद्धा देते. मग आणता का मनूला ? आणि बनूला दिखील घेऊन या हं. बापूला विटीदांडू खेळायला कोण हो, बनू नाही आला तर ? "

काकाकाकूंचा शेजार दुरावल्याबद्दल मुलांच्या दृष्टीनंही आम्हाला अवघडच वाटत होतं. आता त्यांच्या जागी दुसरं बिऱ्हाड येईल ते कुणाचं येईल, ती माणसं कशी असतील, प्रेमळ नसली तर नसू देत, पण भांडखोर नसली म्हणजे मिळवली, असे नाना प्रकारचे विचार आमच्या मनात थैमान घालू लागले होते. नव्या बिऱ्हाड-करूंना मुलं असतील का, आणि असली तर गरीब असतील की खोडकर असतील, त्यांची संगत आमच्या मुलांना बाधक होईल की

काय, ही धास्तीही आम्हाला वाटू लागली होती. या धास्तीनंच ही एकदा मला म्हणाली,

"काकाकाकूंसारखी देवमाणसं नवस करूनसुद्धा लाभायची नाहीत कुणाला. त्यांच्या जागी आता कोण कोण्या प्रकारचे लोक येणाराहेत कुणास ठाऊक! असले भुतासमंधासारखे, तर बिऱ्हाड बदलून दुसरीकडे गेलेलं बरं. आणि त्यांची पोरं तरी सुधी कुठली असायला! अलीकडे पोरांच्या एकेक खोडी बघितल्या, की छाती धडधडायला लागते. तो जोशांचा हऱ्या दहा वर्षांचा झाला नाही, तर विड्या ओढतो म्हणे! नि त्या इनामदारांचा जयंत चोऱ्या करून हॉटेलात जातो, सिनेमा बघतो. तसली कुणी ध्यानं आली आणि सुमी-बापूला लावल्या त्यांनी घाणेरड्या खोडी, तर करायचं काय?"

"अग, पण न पाहिलेल्या माणसांबद्दल कुतर्क रचून तू घाबरी कशासाठी होतेस! त्यापेक्षा नव्या बिऱ्हाडातली माणसं काका-काकूंपेक्षा, निदान त्यांच्याइतकी तरी गोड स्वभावाची आणि प्रेमळ आचरणाची असतील, आमच्या मुलांनी त्यांच्या मुलांचा कित्ता गिरवावा असं उत्तम वळण त्यांनी आपल्या मुलांना लावलेलं असेल, अशी इच्छा तू का करू नयेस! तू वाईट इच्छा करीत बसलीस तर तसंच व्हायचं एखाद वेळी. इच्छा तशी फळं म्हणतात. म्हणून आपण नेहमी उत्तम तेवढं इच्छीत असावं."

आठपंधरा दिवस अशा स्थितीत गेले. नंतर एके दिवशी संध्याकाळी मी घरी येताच हिनं विचारलं,

"कळलं का! उद्यां नवं बिऱ्हाड येतंय् काकांच्या जागेत."

"कुणाचं?"

"कोण आहेत कुणाला ठाऊक! डाक्तर आहेत हे बरिक कळलं."

"नाव नाही कळलं?"

"नाव कळलंय्, पण त्यावरनं त्यांची जातपात नाही ओळखायला येत. डॉ. बी. सदानंद अशी पाटी लावून गेलेत ते दुपारीच."

"सारस्वत दिसताहेत."

"मंजे? पाणशेंगा येणार की काय तरी? ईऽऽग बाई!!" शिसारी आल्यासारखे अंग हेलकावून ती उद्गारली.

"अग, पण ते अगदी सोवळे ब्राह्मणसुद्धा असणं शक्य आहे, निदान ते हिंदी तरी आहेतच," मी म्हणालो.

पण डॉ. सदानंद हे आमच्यासारखेच महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत असं दुसऱ्या दिवशी आम्हाला कळून आलं. डॉक्टरांच्या पत्नी सौ. कावेरीबाई आणि भुसावळच्या हिच्या ताईच्या घरी राहाणाऱ्या कुळकर्णी मास्तरांच्या शरयूबाई या सख्ख्या आतेमामेबहिणी हे नाते कळल्यावर तर डॉक्टरमहाशयांच्या ब्राह्मणपणाबद्दल शंकाच उरली नाही. डॉक्टरमहाशयांच्या घरात नऊदहा वर्षांची एक मुलगी आणि चारएक वर्षांचा एक छोकरा यांहून मुलांची गर्दीही दिसली नाही व एवढ्या लहान मुलांकडून आपली मुलं बिघडवली जाण्याची हिची धास्तीही कमी झाली. एकंदरीत डॉक्टरांचा शेजार आपल्याला उपद्रवकारक होणार नाही म्हणायचा!

डॉ. सदानंदाच्या शेजारात माझी स्वतःची एक आवड पूर्ण होण्याची आशा मला वाटू लागली. माझी मुलं मला आवडतात आणि त्यांच्याबरोबर खेळायला येणाऱ्या मुलांशी गट्टी करण्यात, त्यांच्याशी बोलण्याखेळण्यातही माझं मन रमतं. डॉक्टरांची मुलगी चिंगी आपल्या छोट्या बट्याला कडेवर घेऊन सुमाकडे खेळायला आली, तेव्हा मला मोठा आनंद वाटला. अनोळखी माणसापुढं पुष्कळ मुलं जो बुझरेपणा करतात त्याचा लवलेशसुद्धा

चिंगीच्या ठिकाणी दिसला नाही. सुमा सकाळी माझ्या खोलीत अभ्यासाला बसली होती तिथं चिंगीची स्वारी दाखल झाली. तिचं वाचन-पुस्तक उचलून आणि ते उघडून चिंगी म्हणाली,

" अय्या, तुमच्या शाळेतसुद्धा सुलभ वाचन पाठमाला आहे? आमच्या शाळेत हीच बुकं आहेत. मला नवं बुक नको घ्यायला आता. "

" तू कोणत्या शाळेत होतीस, चिंगूताई? " सुमानं विचारलं.

" आमच्या आरसगावला एकच शाळा आहे. तिथल्या तिसरीत सत्रावा नंबर होता माझा. तिसरीवर लंबूटांग मास्तर आहेत तिथं. "

" लंबूटांग! हे कसलं बाई मास्तरांचं नाव? "

" ते खरं नाव नव्हे ग त्यांचं. पण ते किनई आमच्या डॉक्टरांच्यापरीस रोडके आणि फार फार उंच आहेत. म्हणून मुलं म्हणतात त्यांना लंबूटांग. "

" आपल्या मास्तरांना अशी नावं ठेवू नयेत बाई. "

" नुसत्या मास्तरांनाच काही नावं ठेवत नाहीत मुलं. दुसरीवर मराठे बाई होत्या, त्यांनासुद्धा मोटारबाई म्हणायची सगळीजणं. मोटारीसारख्या काळ्याभोर दिसतातच नाहीतरी त्या. "

आपल्या जुन्या शाळेच्या गोष्टी सुमाला सांगता सांगता चिंगीचं लक्ष माझ्याकड गेलं. तिनं मला विचारलं,

" या चिंगीचे डॉक्टर तुम्ही, होय? तुमचा दवाखाना कुठाय? मला दाखवता? "

" मी काही डॉक्टर नाही आणि ही चिंगी नव्हे. हिचं नाव सुमाताई आहे. "

" तुम्ही डॉक्टर नव्हे, तर सुमाताईचे तुम्ही कोण? "

" हे आमचे दादा, " सुमानंच तिच्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

"अन् तुझी ताई कुठाय्?"

"घरात काम करतीय्. मी वैनी म्हणते तिला."

"सुमाताई, तुझी वैनी तुला दादांच्या खोलीत नि दवाखान्यात कधी सोडत नाही?"

चिंगीचा हा बोलकेपणा मला गमतीदार वाटला. साधे प्रश्न, पण अगदी रंगून गेलेली दिसली पोरगी बोलण्यात. चिंगी काळसरच आहे. तिचे केस आणि कपडे अस्ताव्यस्त असतात. पण तिचे खेळकर डोळे आणि हसरी चर्या बघून तिच्याविषयी मला तरी प्रेम वाटतं.

सुमाच्या आणि तिच्या गोष्टी आणखीही लांबल्या असत्या, पण समोरच्या माडीवरून तिच्या आईची हाक आली,

"चिंगे, कशाला गेली आहेस तिथं? चल इकडे मुकाट्यानं."

या हाकेसरशी चिंगीची चर्या कावरीबावरी झाली. इतका वेळ फुलून राहिलेला तिच्या मुद्रेवरला उल्हास पार मावळला आणि धन्याची छडी दिसताच पाळीव कुत्रं अंग चोरून दाखवलेल्या जागेवर जसं जाऊन बसतं, तशीच चिंगी आपल्या घरी चालती झाली. बव्याला घेऊन जाण्याचं भानही तिला राहिलं नाही! सुमानं पोचवलं त्याला त्याच्या आईकडे.

पुढं दहापाच वेळा हाच प्रकार आम्हांला दिसून आला.

आईचा आणि वडिलांचा डोळा चुकवून चिंगीनं आमच्या घरी यावं, तिच्या गुलगुल गोष्टी सुरू व्हाव्या, इतक्यात घरातून हाक यावी आणि चिंगीनं चूपचाप आपल्या घरी निघून जावं. असल्या गोड मुलीला आईवडिलांनी धाकात का धरावं हे कोडं आम्हांला उलगडेना.

सुमानं हादगा घातला होता आणि आपल्या सोबतिणी जमवून गाणी म्हणायचा नि खिरापत वाटायचा कार्यक्रम रोज संध्याकाळी चालू होता. सुमानं पहिल्या दिवशी चिंगीला बोलावलं तेव्हा तिच्याऐवजी ताईंनीच उत्तर दिलं,

"बरं का सुमाताई, चिंगीच्या पोटात दुखतंय दुपारपासून, म्हणून ती नाही येत हादगा नाचायला."

दुसऱ्या दिवशीही असंच काहीतरी कारण सांगून त्यांनी सुमाला परत पाठवलं. तिसऱ्या दिवशी मात्र सुमा बोलवायला जायच्या आत चिंगीच अंगणात हजर झाली होती आणि 'एक लिंबू झेलू बाई दोन लिंबं झेलू' हे गाणं तिनंच सांगितलं. 'किती छान गळा आहे चिंगूताईचा' असं सगळ्या मुलींनी कौतुक केलं तिचं. पण रात्री सुमानं आणलेली बातमी ऐकून आम्हांला धक्का बसला. न विचारता हादगा नाचायला गेल्याबद्दल ताईंनी तिचे गालगुच्चे घेतले आणि धपाटेही घातले म्हणे!

रविवारच्या सुटीत सुमा आणि तिच्या मैत्रिणी खेळणपिटाची भातुकली मांडायच्या. आपल्या या नव्या मैत्रिणीला बोलावण्याचा मोह सुमाला झाल्यावाचून कसा राहील! सुमानं बोलावलं आणि चिंगी आलीही. पण पाच मिनिटांतच ते ताईंच्या दृष्टीला पडलं आणि 'चिंगे, चल ये घरी अगोदर' असं त्यांचं फर्मान सुटलं. चिंगीचे डोळे पाण्यानं डबडबले. ते पाहून ही म्हणाली,

"ताई, खेळती आहे मुलींत, तर खेळू दे ना?"

"काही नकोत लाड करायला. चार पावलं दूर असलेल्याच बऱ्या या बयाबाई."

ताईंनी चिंगीविषयी असं का म्हणावं हे आम्हांला कळेना. ती थोडी जास्त बोलकी किंवा वटवटी आहे असं म्हटलं असतं

तर खरं वाटलं असतं आम्हांला. पण तिला चार हात दूर लोटावं असा कोणताही खट्याळपणा आतापर्यंत आम्हांला दिसला नव्हता. शिस्त लावण्याच्या नावावर मुलांशी फाजील कठोरपणानं वागणारी कित्येक वडील माणसं असतात. डॉक्टर आणि सौ. ताई त्यांतलीच आहेत असं आम्हांला वाटू लागलं ! त्यांच्या तावडीत सापडलेल्या चिंगीची कीव आली आम्हांला. पण करायचं काय ? मुलांची मुखत्यारी आईबापांकडे. ती ठेवतील तसं राहाण्याखेरीज मुलांना गत्यंतर कुठलं ?

एके दिवशी ही मला म्हणाली,

" आज डाक्टरीणबाई बसायला आल्या होत्या दुपारी. "

" अगदीच माणूसघाण्या नाहीत म्हणायच्या ! मुलीला बाहेर फिरकू न द्यायच्या त्यांच्या तऱ्हेवाईकपणावरून मला वाटत होतं, त्यांना माणसंच नकोत. बरं, काय म्हणत होत्या ? "

" तेच तर सांगायचं तुम्हांला. त्यांनी सांगितलं, ' चिंगीला तुमच्याकडे येऊ देऊ नका ' म्हणून ! "

" पण कारण तरी काय पोरीवर असा बहिष्कार घालायला ? "

" म्हणे, पोरटी फार कडमडी आहे. केव्हा काय उपद्व्याप करून ठेवील याचा पत्ता नाही लागायचा. तिच्या गुलगुल गोष्टी ऐकायला गोड लागतात आणि त्यामुळं ती हवीहवीशी वाटायला लागते लोकांना. आणि मग लडिवाळपणानं तिला जवळ घेतलं, की दाखवते ती आपला प्रताप. तिच्या हातावर म्हणे नक्षत्र पडलंय. डॉक्टरांनी लोकांचे दात काढताना तिनं बघितलं होतं, तर दवाखान्यातला चिमटा पळवून परवा तिनं शेजाऱ्याच्या कुत्र्याचा दात काढायचा खेळ केला आणि त्या खेळात आपलेच

हात ओरबडून घेतले ! इथं असलं काही व्हायला नको म्हणून जपताहेत डॉक्टरीणबाई. ”

मुलीला कैचीत धरण्यात डॉक्टरीणबाईंना काहीतरी निमित्त आहे ही गोष्ट आम्हांला पटली, तरी चिंगीचं हे वागणं म्हणजे नुसता व्रात्यपणा नसून थोर माणसं करतात तसं आपण करायचं ही मुलांची स्वाभाविक वृत्तीच चिंगीच्या ठिकाणी प्रबळ आहे, असं मला वाटलं. मुलांच्या या प्रवृत्तीला धाकानं दाबून ठेवण्या-ऐवजी तिला योग्य वळण लावण्यातच पालकांचं कौशल्य आहे. पण हे डॉक्टर-डॉक्टरीणबाईंना कुणी नि कसं पटवून द्यायचं ?

चिंगीचा धडपड्या स्वभाव तिच्या वडिलांनी योजलेल्या उपायांनी दबेल का ? की खाली दडपलेला चेंडू अधिक जोरानं उसळून वर उडतो, तसा अधिकाधिक उसळ्या मारू लागेल, या विचारात मी गढून गेलो होतो, तो ही घाबऱ्या घाबऱ्या खोलीत येऊन म्हणाली,

“ किल्ल्यांचा जुडगा घेऊन चला लवकर डाक्टरांच्यात. ”

“ काय झालंय ? ”

डाक्टरीणबाई कोठीच्या खोलीत अडकून पडल्याहेत आणि हाका मारताहेत. ”

“ त्या कशा अडकल्या खोलीत ? ”

“ कोण जाणे बाई ! ”

डॉक्टरीणबाईंना कोणी कशासाठी कोंडून घातलं असेल याचा विचार करीत बसण्यापेक्षा त्यांची सुटका प्रथम करणं अवश्य होतं. मी तिच्याबरोबर कंदील आणि किल्ल्या घेऊन डॉक्टरांच्या बिऱ्हाडी गेलो. खोलीला घातलेलं कुलूप पाहाताच त्याला आपल्यापासली कोणतीच किल्ली चालणार नाही हे मी ओळखलं.

पण आपण शक्य ती खटपट केली असं डॉक्टरीणबाईंना वाटावं म्हणून कुलपाच्या तोंडात चारसहा चाव्या घुसवण्याची मी खटपट केली.

डॉक्टर बाहेरून आले. या चापाच्या कुलुपाला कोणतीच किल्ली लागणार नाही हा निर्णय त्यांच्या मुखाने जाहीर झाला आणि त्यांच्या किल्लीचा त्यांनी शोध केला. पण हवा तो जिन्नस हवा तेव्हा थोडाच सापडायला बसलाय ? आता हे कुलूप निघायचं कसं या फिकिरीत आम्ही पडलो, तों डॉक्टरीणबाईंची 'ई ! मेले !' अशी एक भीतियुक्त आरोळी खोलीतून आली. झुरळ किंवा पालीसारखं काही तरी अंधारात त्यांच्या अंगावर चढलं होतं.

आता अधिक वाट पाहाण्यात अर्थ नाही असं पाहून आम्ही कुलूप फोडलं आणि भीतीनं घामाघूम आणि गोऱ्यामोऱ्या झालेल्या ताई बाहेर आल्या. नंतर त्या आत असता खोलीला कुलूप कुणी घातलं याची चौकशी सुरू झाली. मोलकरीण किंवा गडी घरी जाताना डॉक्टरीणबाई खोलीत असतील ही कल्पना नसल्यामुळं टाळं लावून गेली असतील ही त्या नवराबायकोची शंका. पण त्यांच्यावर विनाकारण आळ घेतलेला चिंगीला मानवेना. तिनं भीत भीत सांगितलं,

"मी घातलं कुलूप, खुर्चीवर चढून."

"काय नडलं होतं बया तुझं ?" ताई रागानं म्हणाल्या, "मला मुद्दाम कोंडून घातलंस होय, खट्याळ कार्टे ?"

"तुला नव्हे. तूं आत होतीस हे मला ठाऊक तरी होतं वाटतं ग ? मी बट्याला थोपटीत बसले होते, इतक्यात एक उंदीर गेलेला दिसला कोठीत. तो पळून जाऊ नये म्हणून मी हळूच दार लावून कुलूप घातलं आणि मांजराला हुडकायला गेले. त्याला आणून सोडणार होते खोलीत. पण सापडलंच नाही कुठं."

चिंगीची ही विद्वत्ता पाहून तिच्यावर संतापलेल्या ताईंनाही हसायला आलं. त्या म्हणाल्या,

"घोड्यापुढं धावतीय कार्टीची अक्कल. थांब, दम धर, डाग देते



" मी घातलं कुलूप, खुर्चीवर चढून. "

आता तुझ्या त्या उपद्‌व्यापी हाताला." आणि आम्हांला निरोप देताना त्यांनी सांगितलं,

" आमचं हे भूत आम्ही घरातच का गाडून ठेवतो हे कळलं ना तुम्हांला वैनी ? ही कार्टी कुणाचा कसा नि कधी जीव घेईल याचा नेम नाही. आमच्या नशिबी हे नष्टचर्य आलंय तेव्हा त्याचे प्रताप आम्हांला सोसलेच पाहिजेत. शेजाऱ्यापाजाऱ्यांना नको आणिक त्रास व्हायला."

ताईंच्या म्हणण्यात खरंच काही तथ्य आहे असं आम्हांला वाटायला लागलं. घरी जाताना ही म्हणाली,

" असली पोरं संभाळायची म्हणजे आईबापांना महाकर्म कठीण व्हायचं ग बाई !"

" पण मला चिंगी अगदी टाकाऊ आहे असं वाटत नाही," मी म्हणालो.

" पोरांच्या खस्ता पुरुषांना खायला लागत नाहीत, म्हणून त्यांचा खट्याळपणाही मौजेचा वाटतो त्यांना. पण बारा महिने तेरा काळ बायकांना चिकटतात मुलं, म्हणून कळते त्यांना त्यांची आग कशी प्रखर असते ती. चिंगीचा गोजिरवाणेपणा तेवढा तुम्हांला दिसतो, पण ताईसारखी शिक्षा घटकाभर नाही सोसायची तुम्हांला."

आता चिंगीचा अधिक कैवार घ्यायची सोय नाही हे ओळखून मी गप्प बसलो. पण माझं मन म्हणत होतं,

" या बायका म्हणताहेत तितकी चिंगी वाईट नाही. क्षणभर तिच्यापायी त्रास झाला, तरी तिच्या सहवासात पुष्कळ आनंद मिळतो हे काय खोटं आहे !"

—*—

# चिंगीचा आज्ञाधारकपणा !

चिंगीला तिची आई नि वडील खट्याळ म्हणतात, पण मला ते खरं वाटत नाही. ती करते त्या गोष्टी सरळपणानंच करते; किंवा तिच्या हातून काही गोष्टी नकळत घडतात आणि त्याच त्यांना खट्याळपणाच्या वाटतात.

परवाचंच बघा. डॉक्टरांनी तिला म्हटलं, " चिंगे, दवाखान्यात माझ्या टेबलावर कार्डं आहेत, ती पोस्टात टाकून ये."

चिंगीनं वडिलांचा हा हुकूम बरोबर पाळला. त्यांच्या टेबलावर होती तेवढी सगळी कार्डं—त्यांना आलेली, त्यांनी लिहिलेली आणि कोरी असलेलीसुद्धा तिनं पोस्टाच्या पेटीत नेऊन टाकली. पोस्ट-मास्तर ओळखीचे असल्यामुळं त्यांनी जुनी आणि कोरी कार्डं डॉक्टरांच्याकडे परत पाठवली, तेव्हा चिंगीची चूक त्यांना कळली आणि ते तिला रागं भरायला लागले. तेव्हा चिंगी म्हणाली,

" तुम्ही मला टेबलावरची कार्डं पोस्टात टाकायला सांगितलंत. तुम्ही लिहिलेलीच तेवढी टाकायला कुठं सांगितलंत ? "

पण चिंगीची ही तक्रार बरोबर असली, तरी डॉक्टरांची एक चपराक आणि आईचं थोडंसं बोलणं बिचारीच्या वाटणीला आलंच.

दुसऱ्या दिवशी प्रकार घडला तो याच्या अगदी उलट. डॉक्टर बाहेर जाताना म्हणाले,

" चिंगे, टेबलावरची पत्रं पोस्टाच्या पेटीत टाक आणि लिहून ठेवलीत तेवढीच टाक. नाहीतर उचलशील भारा आणि देशील टाकून."

चिंगीनं वडिलांची ही आज्ञा देखील अक्षरशः पाळली.

संध्याकाळी परत आल्यावर पाहातात, तो जी दोन महत्त्वाची पत्रं आज जायलाच हवी होती ती टेबलावरच पडलेली डॉक्टरांना दिसली! त्यांनी चिंगीला हाक मारून विचारलं, " चिंगे, मी तुला पत्रं टपालात टाकायला सांगितलं होतं की नाही?"

" मग टाकली की."

" मग ही पाकिटं इथंच का राहिली?"

" तुम्ही लिहिलेली तेवढी पत्रं टाकायला मला सांगितलंत. या पाकिटांवरचे पत्ते तुम्ही लिहिलेले नाहीत, छापलेले आहेत आणि आतले कागद तरी तुम्हीच लिहिलेत हे मला कसं कळणार? चूक व्हायची नि तुम्ही मला कालच्यासारखं बोलायचे म्हणून मी नाही नेली ही पत्रं."

काही औषधांची मागणी होती ती आणि ती अगदी जरुरीनं जायला हवी होती. तिलाच नेमका उशीर झाला चिंगीच्या सावधपणामुळं. डॉक्टर त्रासून म्हणाले, " ही कार्टी एक गोष्ट सरळ करायची नाही कधी."

चिंगी चांगल्या उद्देशानं म्हणून करते त्या गोष्टीसुद्धा तिच्या कशा अंगाशी येतात याची अनेक उदाहरणं आम्हाला पाहायला सापडतात.

डॉक्टरांच्या घरी दूध घालायला येणारी गवळण म्हातारी झालेली आहे आणि तिला सारखा खोकला येत असतो. अगदी थकलेली आहे ती. परवा ती दूध घालायला आली, तेव्हा पायरीवर कासंडी ठेवून तिथंच तिनं बसकण मारली. तिला खोकल्याची उबळ आली होती.

"राधाबाई, इथंच का बसलात?" चिंगीनं विचारलं. खोकल्यामुळं म्हातारीला बोलवेना. तिनं थोडं थांबण्याबद्दल चिंगीला खुणेनं सांगितलं.

त्या वेळी डॉक्टरीणबाई घरी नव्हत्या. चिंगीला दूध घ्यायला त्यांनी सांगितलं होतं.

राधा गवळण खोकला थांबल्यावर दूध घालायला लागली तेव्हा तिचा हात लटलट कापत होता. चिंगी म्हणाली,

"तुमचा हात इतका का थरथरतोय राधाबाई!"

"म्हातारपणी असंच होतं बाई. अंगात बळ नसतं–"

"मंजे तुमाला खोकला येतो आणि बळ मंजे शक्तीही नाही. खोकल्यावर आणि शक्तीवर छान चांगली औषधं असतात. ती का घेत नाही तुमी?"

"आम्हा गरिबाला कुठलं औषध बाई! आणि आता औषधानं तरी काय हुयाचंय?"

"औषध घेतलं की गुण येतोच बरं का. आणिक तुमी गरीब झाला म्हणून तुमाला औषध मिळायला हो काय झालं! थांबा राधाबाई, दूध आत ठेवते आणि तुम्हांला औषध आणून देते."

चिंगीने एक बाटली आणि पेला आणला. म्हातारी, ही पोर कसलं तरी कडू औषध पाजील या शंकेनं टंगळमंगळ करायला लागली. पण चिंगी म्हणाली,



'बघा तरी पिऊन.'

"हे शक्ती यायचं नि खोकला जायचं औषध आहे. मला पक्कं माहीत आहे. आमच्या बब्याला हे आणलंय डॉक्टरांनी. बघा तरी पिऊन."

म्हाताऱ्या गवळणीनं भीतभीत औषधाचे आचमन घेतले आणि मग त्या स्वादिष्ट सरबताचा सबंध पेला रिकामा केला. चांगले औषध दिल्याबद्दल चिंगीची तारीफ करून म्हातारी म्हणाली, "जल्माचं दुखणं अन येक रोज औशिद. काय हुनार त्येनं?"

"खरं आहे तुझं म्हणणं म्हातारे. पंधरा दिवस तरी घ्यायला हवं औषध, असं आमचे डॉक्टर सगळ्यांना सांगतात. मग तुला तरी कसा येईल गुण एक दिवसात! ही बाटलीच घेऊन जा तू आणि रोज घे थोडं थोडं. संपलं, की सांग, आणखी एक बाटली देईन. डॉक्टरांच्या कपाटात पाचसहा बाटल्या आहेत असल्या."

म्हातारी, गोड रुचकर औषध आणि तेही फुकट मिळाल्याच्या आनंदात निघून गेली. चिंगीलाही आपण आज एक चांगले काम केले म्हणून आनंद वाटायला लागला. प्रत्येक मुलामुलीने रोज एक चांगले कृत्य करावे असे आज तिच्या बाईंनी शाळेत सांगितले होते.

आई घरी आल्यावर चिंगी तिला म्हणाली,

"आई, आपली म्हातारी गवळण किती थकलीय! दुधाची चरवीदिखील उचलत नाही तिला."

"मग म्हणणं काय तुझं! तू जाणार आहेस की काय तिचं ओझं उचलायला?"

"पण तिला उद्यापासून कुणी मदतीला लागायचंच नाहीं. खूप खूप बळ येणार आहे तिला. दांडग्या बैलाला रेटीत नेईल ती बाटलीवरल्या चित्रात आहे तसं."

"पुरे ग तुझी वटवट. काहीतरी डोक्यात घ्यायचं नि बडबडत बसायचं. मेलीची ही खोड कधी जाणाराय कुणास ठाऊक."

आपली कर्तबगारी सांगून आईची शाबासकी मिळवावी म्हणून चिंगी सांगायला गेली, पण आईने नुसते ऐकून सुद्धा घेतले नाही! चिंगीचा फार हिरमोड झाला. 'आता काही म्हटल्या काही सांगायची नाही मी आईला. विचारलन् तरी बोलायची नाही' असे पुटपुटत ती आपल्या अभ्यासाला लागली.

डॉक्टर घरी आल्यावर त्यांना आपली वैद्यगिरी सांगावी असे तिला वाटले, पण तिला शंका आली, 'आईसारखंच डॉक्टरांनीही आपल्याला झिडकारलं तर?' आणि या भयाने तिने वडिलांना यातले काही सांगितले नाही.

पण चिंगीचा पराक्रम डॉक्टरांना कळायला वेळ लागला नाही. जेवण झाल्यावर सुपारी कातरीत ते माझ्याकडे यायला आणि

'डागदारसाब, डागदारसाब' अशा अंगणातून घाबऱ्या हाका ऐकू यायला गाठ पडली.

"कोण आहे?"

"मी किश्ना गवळी."

"काय पाहिजे?"

"बिगी बिगी चला. म्हातारी घाबरी झालिया."

"काय झालं रे तिला एकाएकी? संध्याकाळी तर दूध घालून गेली."

"तवाच्यान काय तरी व्हायला लागलं नि आता तर तडफड-तिया नुसती."

डॉक्टर ताबडतोब गेले आणि तासाभराने परत आले ते सौभाग्यवतीवर कावत....

"तुम्ही असता कुठे नि करता काय? मुलांच्यावर लक्ष ठेवायचं कुणी?"

"पण झालं काय?"

"तुमच्या लेकीनं दिवे लावले. कुणाचा तरी जीव घेऊन ही कार्टी मला फासावर चढवणार."

चिंगीने दिलेले औषध राधा गवळणीला चांगलेच भोवले. पेलाभर पाण्यात चमचाभर औषध या प्रमाणाकडे चिंगीचे लक्ष गेले नव्हते आणि तिने पेलाभर औषधच म्हातारीला पाजले होते! औषध खोकल्यावरचे होते, शक्तिवर्धक होते आणि रोड मुलांना ते नियमाने दिल्यास मस्त बैलाची शिंगे धरून त्याला दाबून ठेवण्याइतकी ती ताकदवान होतात असे बाटलीवरच्या रंगीत चित्रात दाखवले होते. आपल्याला रोज ताजे दूध आणून देणारी

गत्रळण खोकल्याच्या त्रासातून सुटावी आणि तिच्या अंगात शक्ती यावी या चांगल्या उद्देशाने तिने हा प्रयोग केला होता.

पण म्हातारीला फळ मिळाले ते विपरीतच. औषध पिऊन घरी गेल्यावर घटकाभरातच तिच्या पोटात आग होऊ लागली आणि घसा कोरडा पडून ती कासावीस झाली. डॉक्टरांना कारण कळल्या-वर त्यांनी उताऱ्याची औषधयोजना केली. पण तिला त्या विष-बाधेतून पूर्णपणे मुक्त व्हायला पंधरा दिवस लागले. तिला औषधे, इंजेक्शने देण्यात डॉक्टरांना श्रम तर पडलेच आणि थोडाबहुत खर्चही सोसावा लागला.

या उपद्व्यापामुळे औषधाला हातही लावायचा नाही अशी चिंगीला ताकीद मिळाली. दवाखाना आणि औषध यांपासून चिंगीला दूर ठेवण्याबद्दल डॉक्टर डोळ्यांत तेल घालून सावधगिरी ठेवायला लागले.

एके दिवशी काय झाले, चिंगी मधल्या सुटीत घरी आली आणि आपल्या पुस्तकाचे फाटलेले पान चिकटवण्यासाठी गोंद आणायला दवाखान्यात गेली. औषधाच्या बाटल्यांवर चिठ्या लावण्यासाठी कंपाउंडरच्या टेबलावर गोंद असतो हे तिला ठाऊक होते. पण चिंगीने दवाखान्याचे दार उघडायला आणि मागून डॉक्टरांची 'चिंगे!' अशी हाक यायला गाठ पडली. चिंगी तेथेच थबकली आणि वडिलांकडे भेदरून पाहायला लागली.

"कुठे चालली आहेस?" डॉक्टरांनी दरडावले.

"द–द–वा–खा–न्यात–!" चिंगीची बोबडी वळली.

"दवाखान्याकडे फिरकायचं नाही म्हणून बजावलं असून पुन्हा चाललीस होय माझा डोळा चुकवून? चल, फीर मागे."

कापत कापत माघारी फिरलेल्या चिंगीला चार चपराकी देऊन डॉक्टर म्हणाले, " आज नुसल्या मारावर सोडलंय तुला. पुन्हा दवाखान्यात गेलेली दिसलीस तर पाय मोडून टाकीन, लक्षात ठेव. "

पण ही ताकीद चिंगीपेक्षा डॉक्टर नि डॉक्टरीणबाईंनाच भोवली.

सकाळी भाजी चिरताना विळीवर डॉक्टरीणबाईंचे बोट कापले. थोडेसे लागले असते तर त्यांनी काळजी केली नसती. पण हाड दिसायला लागेपर्यंत बोट तासले गेले आणि रक्ताची धार लागली.

" चिंगे, पळ. दवाखान्यात जाऊन रामाला बोलावून आण. बोट बांधायला हवं. पळ. "

" मी जायची नाही. "

" मस्तवाल कार्टी. जातीस की नाही ? "

" मुळ्ळी जायची नाही मी. तुझ्या बोटाबरोबर माझा पाय जायचा. "

चिंगीच्या अडेलतट्टूपणाचे कारण डॉक्टरीणबाईंच्या लक्षात आले आणि आपल्या परवानगीने दवाखान्यात गेल्यावर डॉक्टर शिक्षा करणार नाहीत असे त्यांनी तिला सांगितले. पण चिंगीची समजूत पटली नाही आणि ती दवाखान्याकडे फिरकली नाही.

जखमेवर ताबडतोब आयडिन घालण्याचा उपाय डॉक्टरीणबाईंना ठाऊक होता आणि आयडिनची कुपी घरातच होती. ती कपाटातून काढून आणायलाही चिंगी नाकबूल झाली. कारण आयडिन हे औषध आहे आणि औषधाला हात लावायचा नाही ही डॉक्टरांची ताकीद आहे, अशी सबब तिने पुढे केली. डॉक्टरीणबाईंना कुपी फडताळातून स्वतःच काढून घ्यायला आली असती. पण त्यांनी कापलेले बोट दुसऱ्या हाताने दाबून धरल्यामुळे त्यांचे दोन्ही हात गुंतले होते.

"आई, कशाला हवंय तुला आयडिन् नि फियडिन्? तू कापलेलं बोट चाटत बस थोडा वेळ म्हंजे झालं."

"थोबाड फोडीन कार्टे, काहीन् बाही बडबडलीस तर. माझं मला पुरे झालंय आणि वर हिची वटवट...."

"वटवट नव्हे ही आई. कुत्र्यामांजरांसारखे प्राणी चाटून चाटूनच जखमा बऱ्या करतात, असं आमच्या पुस्तकात आहे आणि बाई म्हणतात, माणूस सुद्धा प्राणीच आहे. एका प्राण्याला जे औषध चालतं ते दुसऱ्याला चालेलच की! नि चोखल्यावर रगत खरंच थांबतं आई. काल शिवणाच्या तासाला सुई बोचून माझ्या बोटाला रगत आलं. मी लगेच जवळ बसलेल्या मनीच्या तोंडात बोट घातलं माझ्या तोंडात आवळा होता म्हणून. बाहेर काढलं तर रगत नाही नि फिगत नाही."

हा सारा प्रकार पाहून तुम्ही म्हणाल, चिंगी खट्याळ असली तरी आज्ञाधारक आहे. आईबापांच्या सांगण्याप्रमाणे ती बिनचूक वागते. पण गरीब बिचारी. वडिलांच्या आज्ञा पाळून शाबासकी मिळण्याऐवजी तिला रागे भरून घ्यावे लागते, मार सुद्धा खावा लागतो.

पण तुम्हाला वाटते त्याप्रमाणे चिंगी वडिलांच्या सर्वच आज्ञा पाळते असे मात्र नाही हं. करू नको म्हणून ताकीद दिलेल्या गोष्टीही ती करते. शेजारच्या रानड्यांच्या बेबीला डांग्या खोकला लागला. डांग्या खोकला संसर्गजन्य असतो आणि एका मुलातून तो दुसऱ्याच्या अंगात शिरतो म्हणून बट्याला घेऊन रानड्यांच्या घरी जायचे नाही अशी डॉक्टरांनी आणि डॉक्टरीणबाईंनी चिंगीला ताकीद दिली होती. पण त्यांचा डोळा चुकवून तेथे जायचा चिंगीचा नेहमीचा क्रम चालूच होता. बट्याला घेऊन खेळवण्याची कामगिरी चिंगीला करावी लागते आणि त्याला झोपाळ्यावर बसायला

मिळाले तर तो खुषीत राहातो हे चिंगीला माहीत झाले आहे. रानड्यांच्या घरी बट्याला हवा असलेला झोपाळा होता आणि तिला स्वतःला मनापासून आवडणारा पोपटही होता. मग तिने तेथे जायचे नाही म्हणजे काय ? ती रोज संधी साधून रानड्यांच्या घरी जात होती, बट्याला झोके देत होती आणि आपण पोपटाकडून 'विठ्ठल विठ्ठल' म्हणवून घेत होती.

आपली ही चोरी लपवण्याची सावधगिरीही चिंगीने आपल्याकडून घेतली होती. रानड्यांच्या ताईने किंवा बंडूने चुगली करू नये म्हणून त्यांना कधी गोळ्या तर कधी पेणसलीच्या तुकड्यांची लाच ती देत होती.

पण लाच खाऊनच्या खाऊन हे साथीदार आज चिंगीशी भांडले. चिंगीच्या वेणीला आईने आज नव्या फितीचें फूल बांधले होते. ताईला ते आवडले आणि 'बघू या ग' म्हणून ओढताच ते सुटले. त्यासरशी वेणीही विसकटली. मग चिंगी बरी गप्प बसेल ? ताईच्या डोकीतले शेवतीचे फूल हिसकून घेऊन चिंगीने ते कुसकरून टाकले. दोघींची थोडी ढकलाढकली नि चिमटाचिमटीही झाली.

" आता बघ तुला गोळ्या नि पेणसली कधी देते का ? "

" न देईनास ? आणि ये तरी आमच्यांत ! मग बघ कसं करीन ते."

" बघू या की काय करतीस ? मी मुळी तुझ्याकडे येतच नाही. मी आपली काकूंच्याकडे येईन. पोपटाबरोबर बोलीन आणि घरी जाईन."

" पण माझ्या पोपटाबरोबर मी बरी बोलून देईन तुला ! दिसायचा सुद्धा नाही तुला माझा पोपट. मी ठेवते तो एका जमतीत."

असे म्हणून ताईने घडवंचीवर चढून पिंजरा काढला आणि ती आत पळाली. आपला आवडता पोपट दृष्टिआड झाल्याने चिंगीला फार दुःख झाले आणि ती डबडबलेल्या डोळ्यांनी घराकडे निघाली.

रानड्यांच्या वाड्यातून चिंगी बाहेर पडायला आणि समोरून डॉक्टर यायला गाठ पडली. त्यांच्या वटारलेल्या डोळ्यांकडे बघायचा चिंगीला धीर झाला नाही. ती चोरट्यासारखी खाली मान घालून घरी गेली.

“ चिंगे, रानड्यांच्या घरी बट्याला घेऊन कशाला गेली होतीस ? ” डॉक्टरांनी दरडावले.

“ आणि होय ग ? झिंज्या कशा विसकटल्या ? तासन्तास बसून वेणी घातली, तर वाट लावलीन् तिची. नि फीत ग काय झाली ? ” आई कडाडली.

चिंगीच्या तोंडून शब्द उमटेना. ती नुसते डोळे चोळू लागली. त्याच वेळी बट्या जरासा खोकला !

“ हा रानड्यांच्या बेबीचा प्रसाद ! शंभरदा बजावलं असून कशाला गेलीस तिथे कडमडायला ? थांब, आता फोडून काढतो तुला.”

“ नकोऽऽ ! पुन्हा जायची नाही–” चिंगीने गळा काढला.

“ करून सवरून कार्टी कसा कांगावा करतीय बघा ! ते काही नाही. नको ते करायची हिची खोड काढून टाकायला हवीच.”

आईबापांच्या या रोषामुळे चिंगीची पुरती घाबरगुंडी उडून गेली. आता आपली धडगत नाही असे तिला समजून चुकले. पण आज तिच्या नशिबात मार नव्हता, कारण त्याच वेळी हातात पोपटाचा पिंजरा घेतलेल्या रानड्यांच्या काकू तेथे दाखल झाल्या.

“ कोण ! काकू ! हे काय ? ” डॉक्टरीणबाईंनी विचारले.

"पण चिंगूताई कशासाठी मुसमुसताहेत?" काकू म्हणाल्या.

"तसलीच गुणाची पोर आहे. काही विचारू नका तिचं. किती जल्म पाप केलं नि हें ध्यान पदरात पडलं!"

"असं हो का म्हणता सोन्यासारख्या मुलीला? भारी गोड मुलगी आहे ही. आमच्या ताईसारखी खत्रुड नाही ही. ताइटूलीने आज चांगलाच करून ठेवलान् उद्योग. खासा सोप्यावरला पिंजरा नेऊन कोठीच्या खोलीत भुईवर ठेवलान् नि तिथे तो मेला काळा बोका करत होता चट्टामट्टा! त्याच्या पंखांचा फडफडाट आणि चिवचिवाट ऐकून मी वेळेवर तिथे गेले म्हणून वाचला हा. पण आज वाचला तरी ताई त्याचं मरण कधी ओढवून आणील याचा काय नेम! आमच्या चुकीचं प्रायश्चित्त या मुक्या पाखराला नको मिळायला. तुमच्या चिंगीला भारी आवडतो हा आणि त्यालाही ही पाहिजे असते. परवा पिंजरा धुताना उडाला नि आंगणातल्या लिंबाऱ्यावर जाऊन बसला. बोलावलं, खाऊ दाखवला तरी उतरता उतरेना खाली. पण तुमची चिंगी आली नि 'विठूमिया ये' म्हणताच बसला की येऊन हिच्या खांद्यावर. म्हणून म्हटलं हिच्या स्वाधीन कायमचं करावं ह्याला. असू दे ना?"

"असू दे, असू दे—" पहिले सगळे दुःख विसरून चिंगी आनंदाने टाळ्या वाजवीत म्हणाली आणि आईवडिलांच्या होय नको म्हणण्याची वाट सुद्धा न पाहाता काकूंच्या हातातला पिंजरा घेऊन 'विठू, विठूमिया' करीत आत पळाली.

—*—

# चिंगीचा पुनर्जन्म

चिंगीचे एकेक प्रश्न मोठे पेचात पाडणारे असतात ! आजच पाहा, ती शाळेतून घरी आली तेव्हा तिचा गाल लाल दिसला म्हणून मी विचारले,

" चिंगे, काय लागलंय ग गालाला ? शाई ? "

" शाई नव्हे, बाई लागल्या...."

" म्हणजे ! तुझ्या बाईंनी थोबाडीत मारली की काय तुझ्या ? कोणत्या बाईंनी ? "

" आमाला कविता शिकवतात त्या मांजरीबाईंनी गालगुच्चा घेतला माझा...."

" मांजरीबाई ! या कोणी नव्या आल्यात वाटतं ? नि त्यांनी गालगुच्चा कशासाठी घेतला ? "

" मांजरीबाई म्हणजे नव्या नव्हेत काही. जुन्या गोडसेबाईंनाच 'मांजरीबाई' म्हणतात मुली. त्यांचे डोळे मांजरीसारखे घारे आहेत म्हणून. त्यांनी वर्गातल्या दरेक मुलीला झोपाळ्यावरची एकेक ओवी म्हणायला सांगितली. ती मी म्हटली, तर बाईंनी गालगुच्चा घेतला माझा. "

" त्यांना राग येण्यासारखी कोणती ओवी म्हटलीस ? आचरटासारखी काहीतरी म्हटली असशील ? "

" त्री म्हणेन मी आचरटासारखी ! परवा आपट्यांच्या वैनींचं झोपाळ्यावरलं डोहाळजेवण झालं तेव्हा लक्षुमकाकूंनी म्हटलेलीच

ओवी म्हटली मी. मात्तर वैनींऐवजी बाईंचंच नाव घातलं मी ओवीत."

"म्हणून दाखव बघू मला ती ओवी !"

"ऐका हं....

पिकावी कूस तुझी
लेकलेकी पाठोपाठ
होऊ देत आठ आठ । आमच्या बाई ॥"

चिंगीच्या या ओवीची मला मौज वाटली आणि या ओवीचा तिच्या बाईंना राग का आला हेही माझ्या लक्षात आले. गोडसे-बाईंवर वैधव्याची कुऱ्हाड गतवर्षीच कोसळल्याचे मला ऐकून ठाऊक होते आणि या अवस्थेत अष्टपुत्रा होण्याचा चिंगीचा आशीर्वाद त्यांना संतापजनक होणे स्वाभाविकच होते. मी चिंगीची चूक तिला समजावून देण्यासाठी म्हटले,

"चिंगे, खुळ्यासारखीच ओवी म्हटलीस तू. तुझ्या या बाईंना आता मुलं व्हायची नाहीत म्हणून राग आला त्यांना या ओवीचा नि त्यांनी शिक्षा केली तुला."

"पण का हो होऊ नयेत मुलं आमच्या बाईंना ? चौथीवरल्या भिंगारेबाईंना म्हणे मागल्या महिन्यातच एकदम मुलगा नि मुलगी झाली. मग आमच्या बाईंना तरी का होऊ नयेत ?"

"अग पण पोर्टे, भिंगारेबाईंना नवरा आहे तसा तुझ्या गोडसेबाईंना नाही. नवरा नसणाऱ्या बाईला मूल होत नाही."

"होतं. समोरच्या घरातल्या बकुळाकाकूंना कुठाय हो नवरा ? पण त्यांना गुलाब नि मोगरी अशी दोन मुलं झालीत."

चिंगीची समजूत कशी घालायची हे माझ्या एकदम लक्षात येईना. मी नुसता हसत तिच्याकडे पाहात राहिलो आणि त्या विषयाला बगल देण्यासाठी म्हणालो,

" चिंगे, तुझी आई तुला साडी कधी घेणार आहे ग? तुझी ती सुंदर बघ. तुझ्यापरीस लहान आहे. पण कशी सुरेख चिरडी नेसून येते तुझ्याबरोबर खेळायला. "

" पण मला चपला घेतल्याहेत तशा सुंदरला कुठाहेत? "

" मला दाखवल्या नाहीस कुठे तुझ्या नव्या चपला! "

" बाहेर नेऊन टाकशील कुठेतरी असं म्हणते आई. माझ्या चपला सांडू नयेत आणि कुणी पळवून नेऊ नयेत म्हणून कुणाच्या नजरेला न पडतील आणि कुणाच्या हाताला न लागतील अशा जागी ठेवायला सांगितलंय आईनं. "

" मग कुठे ठेवल्या आहेस? "

" ठेवल्यात एका जमतीत. "

" पण आम्हांला दाखव तरी. "

" आमी नइ जा. "

असे म्हणून चिंगी पळून गेली, तरी तिने कोणत्या जमतीत आपल्या नव्या चपला छपवून ठेवल्या होत्या हे कळायला वेळ लागला नाही.

रात्री आम्ही जेवायला बसायच्या तयारीत होतो. इतक्यात चिंगीच्या रडण्याचा सूर आणि तिच्या आईने तिच्यावर उडवलेला गहजब आमच्या कानांवर आला. काय प्रकार आहे तो पाहायला मी शेजारच्या बिऱ्हाडी गेलो आणि थोड्याच वेळात चिंगीला हाती धरून हसत हसत परत आलो. चिंगी अद्यापि मुसमुसतच होती.

"काय झालं ?" तिने विचारले.

"लोणचं मेतकूट विटाळलं म्हणून डॉक्टरीणबाईंनीं प्रसाद दिला पोरीला."

"म्हणजे केलंन् काय हिने ?"

"नव्या चपला नेऊन ठेवल्या बाईसाहेबांनी लोणच्याच्या बरणीवर."

"होय ग चिंगे ? चपला नि जोडे सोवळ्यात ग कशाला ठेवलेस ?"

"मला काय माहीत पापड लोणचं सोळं असतं ते ? आईनेच सांगितलं होतं, चपला कुणाच्या हाती न लागतील अशा जागी जपून ठेवायला. सैपाकघरच्या फडताळाकडे कुणी जात नाही म्हणून माझ्या चपला मी तिथे ठेवल्या. हात पोचत नव्हता तरी घडवंचीवर चढून सगळ्यांत वरच्या कप्प्यात लोणच्याची बरणी नि पापडांचा डबा यांच्यामध्ये त्या ठेवल्या. आईनं सांगितलं तसं मी केलं तर मारलन् तिने...."

चिंगीला फिरून रडण्याचा उमाळा येतोसा पाहून मी तिला जवळ घेतले आणि थोडे गोंजारून म्हटले, "हे पाहा चिंगे, वडील माणसं सांगतात तसं लहान मुलांनी वागलंच पाहिजे. पण ती काय सांगतात त्याचा उद्देश लक्षात घेऊन वागलं पाहिजे. तू आपले खेळ, पुस्तकं, पेणसली सोप्यावर उघड्या टाकतेस आणि मुलं त्या पळवतात. नाहीतर कोणता जिन्नस कुठे ठेवतेस ते तुझ्या ध्यानातच राहात नाही आणि मग पाहिजे असेल तेव्हा तो सापडत नाही. दोन रुपये देऊन आणलेल्या तुझ्या नव्या चपलांचं तसं होऊ नये म्हणून आईने तुला त्या जपून ठेवायला सांगितलं.

पोरी, चपला जोडे हे पडवीतल्या कोनाड्यात ठेवायचे. स्वयंपाक-घरात का नेतं कुणी कातड्याचे जिन्नस ? ”

“ मग मोठी माणसं नेतात ते हो ? सैपाकघरातच का, पण अगदी देवघरात सुद्धा नेतात. नि नुसता कातड्याचा जिन्नस नव्हे, तर मोठ्ठं थोरलं कातडं नेतात. डॉक्टर सकाळी गुरुचरित्र वाचतात देवापुढे ते हरणाच्या कातड्यावर बसून. त्याचा हो का नाही विटाळ होत त्यांना ! ”

चिंगीने फिरून मला अडवले. वाघ, हरिणाच्या कातड्यांना विटाळ नसतो आणि ती सोवळ्यात चालतात असे मी म्हटले, तर तीच का सोवळ्यात चालतात असे ती विचारल्यावाचून राहाणार नाही आणि तिच्या त्या प्रश्नाचे तिची समजूत पटेल असे उत्तर मला देता यायचे नाही अशी मला भीती वाटली म्हणून त्या विषयातून तिचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी मी म्हटले,

“ चिंगे, उद्या एका गमतीला जाणार आहो आम्ही. आमच्या सुमाताईच्या शाळेचं गॅदरिंग आहे उद्या आणि रात्री नाटक व्हायचंय. सुमाचं काम आहे त्यात. आम्ही जाणार बघायला. ”

“ मी येऊ तुमच्याबरोबर ! ”

“ अग पण तुला पास कुठे आहे ? काम करणाऱ्या मुलींच्या घरच्या माणसांनाच पास असतात. ”

“ मग मला का नाही पास ? सुमाताई नि मी एकाच घरात राहात नाही वाटतं ! मग का हो देऊ नये आमाला पास ? डॉक्टर, आई, मी आणि बट्याला सुद्धा पास द्यायला हवा सुमा-ताईच्या बाईंनी. त्यांनी नाही दिला तर भांडीन मी त्यांच्याबरोबर. ”

आणि चिंगीने म्हटल्याप्रमाणे केले. ती सुमाच्या शाळेत मुख्य बाईंकडे गेली आणि सुमाच्या घरातच आपण राहतो या हक्कावर

तिने पासाची मागणी केली. तिच्या धिटुकल्या स्वभावाचे आणि खेळकर वृत्तीचे बाईंना कौतुक वाटले आणि त्यांनी तिला नाटकाला यायला तर सांगितलेच पण दुपारच्या स्नेहभोजनालाही ठेवून घ्यायला सुमाला सांगितले. खेळ, शर्यती आदिकरून बहुविध कार्यक्रमात चिंगी अगदी रमून गेली. आपण घरात न सांगता येथे आलो आहो याचे तिला भानही राहिले नाहीं.

रोज साडेदहापासून घायकुत्या घालणारी चिंगी अकरा वाजले तरी जेवायला आली नाही, तेव्हा डॉक्टरीणबाई तिच्या शोधाला लागल्या. त्यांनी आमच्या घरी येऊन पाहिले, शेजारच्या वाड्यातल्या मालीला विचारून पाहिले, पण चिंगीचा पत्ता नाही ! गोऱ्यांच्या मन्याने सांगितलेल्या माहितीने त्यांच्या छातीत धस्स झाले. त्याने सांगितले,

" सकाळी दिध्यांच्या परड्यात विहिरीच्या कुंभीवर चढून चिंगी जाईची फुलं तोडीत होती. तिथून कुठे गेली कुणाला ठाऊक ? "

डॉक्टरीणबाईंच्या पोटात धस्स झाले ! चिंगी विहिरीच्या कुंभीवर चढली होती ! मन चिंती ते वैरी न चिंती म्हणतात, तसे झाले त्यांचे. ' पोरटी विहिरीत कोसळली की काय तरी ! ' असे मनात आले त्यांच्या क्षणभर. अस्वस्थ मनाने त्या दरवाजात तिची वाट पाहात राहिल्या. त्यांच्या नजरेपुढून गेलेल्या देखाव्याने आणि त्यांच्या कानांवर पडलेल्या शब्दांनी तर त्यांची पुरती घाबरगुंडी उडवली.

प्रथम एक मोटार लॉरी त्यांच्या पुढून धडधडत गेली. मागून लोकांचा एक घोळकाही घाबऱ्या घाबऱ्या लगबगीनं जाताना त्यांना दिसला. मोठ्या माणसांच्या घोळक्यामागून काही मुलेही धावत होती. त्यातल्या एकाला थांबवून त्यांनी काय भानगड आहे हे विचारले. त्याने म्हटले,

“एक मुलगी मोटारीखाली सापडली, तिला इस्पितळात नेलंय....”

“मोटारीखाली मुलगी सापडली ती कोण? चिंगी तर नसेल? असायचीही. नको तिथे कडमडत जायची खोड आहे तिला. करावं तरी काय आता? पुरतं विचारून घ्यावं तर तो पोरटा पळाला सुद्धा!’

चिंगीच्या खट्याळपणाबद्दल डॉक्टरीणबाईंनी तिला कितीदा तरी झोडपले असेल आणि ‘ही छळवादी कार्टी मरत नाही एकदाची–’ असे वैतागाचे उद्‌गारही त्यांच्या तोंडून अनेकदा निघाले असतील. पण खरोखरच तसा प्रसंग ओढवतो की काय या शंकेने त्यांचे काळीज धडधडायला लागले. त्यांची चर्या कष्टी दिसायला लागली. आवाज कापरा झाला. माझ्याशी त्या कधी बोलायच्या नाहीत. पण मला ऐकू जाईल अशा बेताने आपण पाहिली ऐकलेली सर्व हकिगत त्यांनी तिला म्हणून सांगितली.

मी आत जाऊन त्यांना धीर दिला आणि चौकशी करायला बाहेर पडलो. प्रथमतः दवाखान्यात जाऊन डॉक्टरांना बरोबर घेतले.

वाटेत कळलेल्या गोष्टी आम्हांलाही भीतिप्रदच वाटल्या. मोटारीखाली मुलगी सापडली हे खरे. मुलगी नऊदहा वर्षांची आहे, ब्राह्मणाचीच दिसते. म्हणजे चिंगीसारखीच! गुलाबी रंगाचा परकर आणि पांढरे पोलके. चिंगीचाही पोशाख असा असतो! पाठीवर शेपटा. चिंगीचाही असतो तो! हातांत सोन्याचा एकेक बिलवर–चिंगीप्रमाणेच की!

सरकारी इस्पितळात जखमी मुलीला नेलेय असे कळले. तेथे गेल्यावर समजले, जखमा गंभीर स्वरूपाच्या असल्यामुळे त्यांना अवश्य ते उपचार करण्याची सोय येथे नव्हती. म्हणून दहा मैलांवरील मोठ्या मिशन हॉस्पिटलमध्ये तिची रवानगी करण्यात आली.

दुखणेकरी दृष्टीस पडताच आम्ही सामान्य माणसे घाबरी होतो. डॉक्टरलोक मात्र मरणोन्मुख माणूस दिसला तरी शांत असतात. पण स्वतःची मुलगीच मरणाच्या दारात बसली असेल की काय ह्या नुसत्या शंकेनेही डॉक्टर अस्वस्थ होऊन गेले.

घरी चिंगीची आई देखील तशीच हवालदिल बसली होती. ती आपल्याकडून होईल तितका धीर त्यांना देत होती.

" अहो, असं काय करता डॉक्टरीणबाई ! गाडीखाली सापडलेली मुलगी चिंगी असती तर कुणीतरी येऊन सांगितलं नसतं का ? शेकडो माणसं तिथं गोळा झाली असतील. त्यांत चिंगीला ओळखणारं कुणीतरी असेलच की. अपघातातली मुलगी चिंगी नाही हे निश्चित सांगते मी तुम्हाला. माझं ऐका तुम्ही."

" तुमच्या तोंडात साखर पडो वैनी नि माझी पोरटी सुखरूप राहो. पण आताशा मला भारी वाटतं हो. पाच वर्सांच्या आत मूल अंबाबाईला नेऊन आणायची ह्यांच्या इथे चाल आहे. चिंगीला दुसरं वरीस लागल्यापासून सासूबाई मागे लागल्या होत्या कोल्हापूरला जाण्याबद्दल. त्या गेल्यावर मी सुद्धा दहादा गोष्ट काढली असेल, पण हे मनावरच घेत नाहीत. देवाचं चुकलं तर तडाखा बसल्याशिवाय राहील का, तुम्हीच सांगा. पाचाऐवजी दोन पाच वर्सं व्हायला आली चिंगीला. गतवर्षीच्या नाताळात ह्यांचे मित्र हरिभाऊ ट्रिपला जाऊ या म्हणत होते. कोल्हापूर, पन्हाळा पाह्यला गेले होते ते. मी म्हटलं, ट्रिपच्या ट्रिप होऊन कुळाचार पुरा करून हुईल, तेव्हा जाऊ या. तर म्हणाले, ' प्रोफेसर असल्यामुळे हरिभाऊला सुटी मिळते. आम्हा डॉक्टरांना असं हवं तेव्हा भटकायला सवड कशी मिळेल !' नि म्हणे त्याच वेळी ह्यांच्याकडे

टायफाइडच्या सीरियस केसी होत्या. मग राह्यलं आमचं कोल्हापूर नि अंबाबाई जिथल्या तिथे ! लोकांच्या जिवाच्या काळज्या करायच्या नि मग आपल्या लेकरांच्यासाठी जीव टांगणीला लागायचा."

मिशन हॉस्पिटलकडे जायला मोटार, निदान टांगा ठरवून आणायला कंपाउंडरला सांगून आम्ही घरी आलो तेव्हा डॉक्टरीण-बाईंचे वरील उद्‌गार आमच्या कानावर आले. डॉक्टरांनाही अंबाबाईच्या कोपाची धास्ती वाटली की काय कोण जाणे ! ते पत्नीला उद्देशून म्हणाले,

" आपली चिंगी सुखरूप घरी येऊ दे. मग तावडतोब फेडून टाकू नवस. गतवर्षी नाही झाली तरी ह्या नाताळात ट्रिप होऊन जाऊ दे."

कंपाउंडर मोटार घेऊन आले. आम्ही दोघे जायला निघालेले पाहून डॉक्टरीणबाईंनी बरोबर यायचा आग्रह धरला आणि तिलाही जीव टांगणीला लावून घरी बसवेना. अखेर आम्ही चौघे आणि बट्या मोटारीत बसलो. गाडी चालू होणार इतक्यात सुमा समोरून धावत येताना दिसली. तिची मुद्राही भेदरलेली होती.

" काय ग ? " मी सुमाला विचारले.

" चिंगी—"

" चिंगी ! चिंगीचं काय ? कुठे आहे ती ? "

" आमच्या शाळेत आलीय्. तिच्या घशात गोटी अडकलीय् आणि घाबरी झालीय्...."

आमची एक चिन्ता दूर झाली आणि दुसरीने आम्हाला घेरलं. आम्ही सुमाला गाडीत घेऊन शाळेकडे धावलो.

शाळेत जातो तों काय, चिंगीला वेढून मुली आणि मास्तरणी हसत राहिलेल्या आम्हांला दिसल्या. आम्हाला पाहताच मुख्याध्यापिकाबाई म्हणाल्या,

" सुखरूप आहे हो तुमची लेक. ह्या छोट्या पाव्हणीने आज आमच्या उत्सवाचा चांगलाच घोटाळा करून ठेवला होता. नशीब तुमचं नि आमचं म्हणून निभावलं. "



चमचा-गोटीच्या शर्यतीत शाळेच्या विद्यार्थिनींबरोबर चिंगीही शिरली. 'चमचा गोटी तोंडात धरून न पाडता सर्वांत पुढे जाईल तिला पहिलं बक्षिस' असे बाईंनी सांगितले होते. सर्व मुली चमच्यात गोटी ठेवून तोल सावरून चालू लागल्या, पण आधी गोटी तोंडात टाकून मोकळा

चमचा दातात पकडून चिंगीने धूम ठोकली. गोटी नरड्यात गेली व चिंगी घाबरी होऊन खाली कोसळली.

शर्यत जेथल्या तेथे राहिली आणि चिंगीच्या उस्तवारीला सर्वजण लागली. किती खटपट केली तरी गोटी बाहेर येईना, खाली उतरेना. चिंगी अधिकाधिक कासावीस व्हायला लागली. मुख्याध्यापिकाबाईंनी डॉक्टरांना बोलवून आणायला सुमाला पाठवले पण सुमा गेल्यावर थोड्याच वेळात चिंगीला एक उचकी येऊन गोटी बाहेर पडली आणि ती सावध झाली.

गंडांतर टळले आणि तेच पुढे गमतीचा विषय झाले. दुसरे दिवशी डॉक्टरीणबाई तिला सांगत होत्या,

" ह्या कार्टीला कोंडून ठेवलं पाहिजे अगदी. बाहेर पडली, की कुणाचा तरी जीव घेईल, नाही तर आपला तरी देईल. एवढी घोडी झाली तरी अक्कल जरा सुद्धा नाही मेलीला. गोटी तोंडात ग कशाला घातलीस ? "

" त्यांनीच नव्हतं का तसं सांगितलं ? चमचा गोटी तोंडात धरायची नि न पाडता पुढे जायचं असं सांगितलं तिथल्या बाईंनी. चमच्यात गोटी ठेवायची असं कुठं म्हटलं त्यांनी ? "

" पुरे झाली अक्कल. सुखासुखी आमच्या जिवाचं पाणी केलंस काल. "

" पण आई, तुला नाताळाची ट्रिप मिळाली त्यातनं. त्याबद्दल बक्षीस दिलं पाहिजेस मला तू. "

चिंगीच्या ह्या मागणीने तिच्या आईलाही हसू आल्यावाचून राहिलं नाही.

*

# चिंगीचे पत्रलेखन

खेळगड्यांनो, तुमच्या बाललेखांकात मी लिहिलेली चिंगीची गोष्ट शोभून दिसणार नाही, पण चिंगीने आपल्या छोट्या भावाला लिहिलेलं नि माझ्या सहज हाती आलेलं एक पत्र त्यात दिलं तर तुमची थोडी करमणूक होईल नि महिनाभर तिची भेट झाली नाही अशी चुटपुट तुम्हाला वाटणार नाही. म्हणूनच मी ते जसंच्या तसं तुम्हांला पाहायला पाठवीत आहे.

श्री मुकाम माडी

ता. २५ मा. २ सन १९४४

श्रियुत बव्याबाळ मुकाम पाळणा यास चींगूताइचा आशिर्वाद. पत्र लीहीण्यास कारण कि माझ्या वरगातलि किशि आपला भावाला पत्र लीहीते मग आमी आमच्या भावाला का लीहु नवे. कीशिला तिचा भाउचं पत्र दर आदीतवारी एतं तसं तूझ माला यऊदे मंजे ती माला आइटि दाखवयचि नाइ. ती त्याला शाळे-तल्या जमति कळीवती म्हणुन मी तूला माझ्या जमती सांगते. काल भूगोलाच्या तासाला बाइनी माला सामूर्दधुनी मंजे काय म्हणुन विच्यारलं तर मी समूद्रच्या काठावर धुणी धूवायची चागा आसते त्याला समुर्दधूनी म्हणतात आसं मी म्हणाले तेवा बाइनि गालगूचा घेऊन एहेरे ध्यान घोडापूढं धावतीय पोरटिचि आकल म्हटलं. टांगादिखिल घोड्याच्या फुडं पळत नाइ. मग माझि आकल टांग्यापेशका ज्यास्त झाली की नाइ बग. तुला-दिखिल माझ्यागत आकल यउदे मोठा झाल्यावर. आणिक एक परवाचि मज्जा सांगायचि राहीली. आमच्या शाळेत इनसपेक्टरिण बाई आल्या होत्या त्यानि माला म्हटलं तूला माझ नाव ठउक

आहे का. मी हो म्हणलं. त्या म्हणाला सांग बघु काय ते. मी म्हणाले तुमचं नाव पिडा. कुणी सांगितलं म्हणुन विचारलिनी तेवा मि सांगितलं बाइनी सांगितलं म्हणुन—होयच नाइतरि उद्या ती पिडा शाळा तपासयला येणार आहे तेवा सगळ्या मुली नवी सच्छ परकर पोलकि घालुन या आस म्हणाल्या होत्या बाइ—ते मी सांगीतलं तर इनपसेकटरीणबाई पाय हापटीत दुसऱ्या वर्गात गेल्या आणि आमच्या बाइनी माझा पाठित धबका घालून म्हटलं तुझ्या तोंडाला डाग दिला पायजे. खोटं बोलु नवे म्हणुन आमाला सांगतात सदानकदा आणीक खर बोलले तर मार देतात नी शीव्या देतात म्हणुन माला बाइंचा भारी राग एतो बघ. मि मोठी झाले कि नाइ मंजे थोरल्या बाइ नाइतर इनसपेटरीण बाई होइन आणी मग या मारकटबाइंना राघं भरिन. बाइगत पलिकलडे त्रिंबकरावही मारकट आहेत. त्यांच्या तारिच्या डोकिंत बटाटे भरलेत आसं बाइनी म्हटलं तें मी त्याना सांगीतलं आणी आता तुमाला मंडइत जायला नको तारिच्या डोकीतनं आयते काढुन घ्या मंजे झालं आस म्हणताना ते माला चालति हो म्हणुन ओरडले. तारीच चांगलं सांगीतल्यावर त्याना कावायला रे काय झालं. माझ्या डोकित तसे बटाटे भरले तर डाक्तराना नी आइला कित्ती बर वाटेल. मी किनइ माझ्या डोक्यात बटाटे नी तुझ्या डोक्यात कांदे भर आसा नवस केलाय देवाला मंजे आइ खूपखुप रसा करील. ईकडील सर्व ठिक तुमचिकडली खुशालि वरच्यावर कळवावि. वडील मंडळीस आशिर्वाद लाहानास नमसकार लोभ आसावा हे वीनंती. वग बरोबर पत्र लीहीलं कि नाइ ते. तुझि आवडति चींगी.

# एका कामात चार कामे

" चिंगे, नळावरले तांबे तेवढे घेऊन ये बघू ! "

आईची आज्ञा चिंगीनें अक्षरशः पाळली. तिने धावत जाऊन तांब्रे आणले व ते आईपुढें ठेवून म्हटले, " आणले तांबे, बघ."

" आणिक ह्यांतलं पाणी काय झालं ? नि टमरेलं नि वाट्या कुठे आहेत ? "

" तू तांबे तेवढे आणायला सांगितलंस म्हणून तांबे तेवढे आणले मी. त्यांतलं पाणी ओतून टाकलं नि पेले वाट्या तिथेंच आहेंत. त्या कुठें आणायला सांगितल्या होत्यास तू ? "

" अहाहा ! दिवें ओवाळा कार्टीच्या शहाणपणापुढे. काही करायला सांगितलं तर अशी तोंडफोड करती मेली. लोकांच्या मुली बघा, एका कामात चार कामं करून मोकळ्या होतात. ती इंदिराकाकूंची शारदा तुझ्यापरीस वर्षाने लहान आहे, पण सारं घर आवरती. आईला हू की चू करू देत नाही. नि तुझ्या हातून एक काम नाही धड होत, एवढी घोडी झालीस तरी. ते काही नाही. मी तुला सैल सोडतें म्हणून नावनाव शेफारायला लागलीस तू. पण आता तुझी मुळीच गय करायची नाही. जा पुन्हा नळावर नि आण तांबे भरून. नि हे बघ, तिथे घासून ठेवलीत ती सारी भांडी आणून जिथल्या तिथें ठेव."

आपण आईने सांगितल्याबरहुकूम वागलो नाही, तरी आई बोलते आणि सांगितल्याप्रमाणे केले तरीही ती बोलतेच, ह्यामुळे चिंगीला वाईट वाटल्यावाचून कसे राहील ? पण आईविरुद्ध तक्रार

तरी कोणाकडे कशी करायची! ती मुकाट्याने रिकामे तांबे भरायला परत नळावर गेली.

पण ती जाईपर्यंत नळाचे पाणी गेले होते. फिरून रिकामेच तांबे घेऊन परत कसे जायचे! चिंगीला मोठे कोडे पडले. पण ती अडून बसणारी मुलगी थोडीच होती? नळाचे पाणी गेले तरी परसातल्या आडाला होतेच की. आणि आडाला पंपही बसविलेला होता. चिंगीने आडावर तांबे भरले, घरात आणून ठेवले आणि नळावर घासून ठेवलेली पाणी प्यायची भांडीही स्वयंपाक-घरातल्या फळीवर नेऊन मांडली.

"हे आधीच केलं असतंस तर! पण तुझी अक्कल जाती एकीकडे नि तू जातीस भलतीकडे. मग मला तोंड वाजवायला लागतं. एखाद्यानं ऐकलं तर त्याला वाटायचं, मी हिची सावत्र आईच आहे नि हिचा एकसारखा छळ करत्येय्. चिंगे, शहाणपणाने वागायला शीक बाई जरा तरी."

आईचे असले व्याख्यान चिंगीच्या रोजच्या सवयीतले होते. तिने ते ऐकले न ऐकल्यासारखे केले आणि ती आपल्या उद्योगाला लागली.

आज रविवार, सुटीचा दिवस, त्यामुळे शाळेची घरघर आणि अभ्यासाचा लकडा तिच्या मागे नव्हता. आजच्या सुटीत शेजारच्या मंदा, कुंदाला बोलवून खेळणपिठाचा बेत करायचा तिने कालपासून ठरविले होते आणि आता त्याच्या तयारीला लागावे असा विचार तिच्या मनात आला. रोवळीतली चूल, बोळकी काढण्यासाठी ती घडवंचीवर चढली. इतक्यात,

"चिंगुणे" अशी आईची लाडिक हाक तिच्या कानावर आली.

"आले हं आई." चिंगी घडवंचीवरून उडी टाकून आत पळाली.

"चिंगे, रमावैनींच्याकडे जा नि त्या आज पापड करणार आहेत का विचारून ये. त्यांना म्हणावं, करणार असलां तर आई येईल दोन वाजून गेले म्हणजे."

"पण आई, त्यात विचारायला कशाला हवं? त्यांना पापड करायचे असले तर त्याच येऊन सांगतील पायजे असलं तर. तुला गऽहले करायचे असले मंजे तू नाही का त्यांना बोलावणं धाडत?"

"सांगितलं ते कर. नसत्या पंचायत्या नको करू."

काय चालणार चिंगीचे आईच्या त्या हुकमापुढे? ती रमावैनींच्या घराकडे निघाली. जाताना तिच्या मनात दुपारच्या भातुकलीचेच विचार चालू होते. 'आईकडून कोणकोणते पदार्थ मागून घ्यायचे, नुसतें पोहें-गूळ पुरतील की दाणे, तिखटमीठ, खोबरंही मागून घ्यावं, नि आपण मागू ते सगळं आई देईल का? नि तिने दिलं तरी बट्या ते सगळं आपल्याला पचू देईल, की तोच दाणेपोह्यांचा नि गूळ-खोबऱ्याचा फन्ना उडवील? हा जी हा, आई रमावैनींच्याकडे पापडाला जायची आहे तेव्हा बट्याला घेऊन जाईल, नि नाही गेली तरी आपण तो राहात नाही घरी म्हणून त्याला तिकडे पोचवावं. मग मंदा, कुंदाबरोबर आपल्याला छान चांगला खेळ खेळायला येईल.'

ह्या विचारांच्या तंद्रीत आपणाला कोठे आणि कोणत्या कामासाठी जायचेय् ह्याचे चिंगीला भान राहिले नाही. ती रमावैनींचे घर गेले तरी पुढेच जात होती. जाता जाता बाजारपेठेच्या कोपऱ्यावर आली आणि तेथल्या संभूशेटने तिला हाक मारली,

"चिंगूताई—"

"काय शेटजी?" चिंगीने जवळ जाऊन विचारले.

“ आईसाहेबांना सांग, ताजं तेल आलंय् ते दुपारी पाठवून देतो गड्याबरोबर. ”

“ मग आत्ता माझ्याजवळच का देत नाही ? ” अंमळ थांबून चिंगीने विचारले.

“ तुझ्याजवळ ? आमचं काम तुला करायला लावलं म्हणून आईसाहेब नि डॉक्टर रागावतील आम्हां गरिबांवर. ” संभूशेट हसत हसत म्हणाला.

“ काही नाही रागावत. मी काम केलं तर त्यांना आनंदच वाटेल उलट. मी काम केलं नाही, तरच आई रागावते माझ्यावर. माझ्याजवळच तेल द्या शेटजी. ”

चिंगीची ही आग्रहाची मागणी शेटजींनी मान्य केली. तेलाचा शिसा त्यांनी चिंगीच्या स्वाधीन केला.

‘ आई नेहमी इंदिराकाकूंच्या शारदेची तारीफ करीत असते. म्हणे ती एका कामाबरोबर चार कामं करते. आज आपण एका कामाबरोबर चारच का, पण पाच देखील कामं आईला करून दाखवू नि तिची शाबासकी मिळवू. मग तरी देईल की नाही ती हवं तितकं खेळणपीठ ? रमावैनींना निरोप सांगायचा हे एक काम झालं, दुसरं झालं तेल, आणखी दोन तीन कामं करायची नि मगच घरी जायचं ’ असा बेत ठरवून चिंगी रमावैनींच्या घराकडे परत फिरली.

“ कोण चिंगे, तू का ही ? ” म्हातारे केसूकाका काठी टेकीत जात होते त्यांनी विचारले, “ डॉक्टर गेले का ग दवाखान्यात ? ”

“ हो, गेले की. तुम्ही कुठे जाताय् काका ! ”

“ अग, तुझ्या बापाकडेच चाललोय्. त्यांनी वाग्भट नि सुश्रुत पाहायला मागितला होता म्हणून दाखवायला निघालो होतो. ”

" मग कुठाहेत ते ? तुम्ही तर एकटेच दिसताय् की ! "

" ह्या पिशवीत आहेत ना ते. "

" पिशवीत आहेत ? अगदीच लहान आहेत तुमचे वाघभट. आमच्या इथे पुजेला येतात ते वासुभट केवढे दांडगे आहेत ! पिशवीत काय, पण पोत्यात सुद्धा मावायचे नाहीत. "

" अहा ग तुझी अक्कल ! " केसूकाका हसत म्हणाले, " पोरटे, वासुभट नि वाग्भट एका जातीचे नाहीत. वाग्भट म्हणजे पुस्तक आहे. "



" मग मी नेईन की ते. तुम्ही कशाला घेता तेवढ्यासाठी हेलपाटा ? एवढंसं चालता तरी तुम्हाला दमायला होतं. द्या ती पुस्तकं माझ्यापाशी. "

चिंगीच्या कनवाळूपणाचे केसूकाकांना कौतुक वाटले. तिच्या रिकाम्या हातात पुस्तकांची पिशवी देत काका म्हणाले, " बापासारखीच गोड पोरगी आहेस तू पोरी. "

दोन कामे झाली. आणखी दोन कामे मिळाली की झाली एका कामाबरोबर चार कामे.

रमावैनींच्या घरापाशी चिंगी येते, तों समोरून डोकीवर कोबी फुलांचा हारा घेऊन मंडईत चाललेली गंगा माळीण तिला दिसली. गंगाचे लक्ष चिंगीकडे गेले आणि एका हातात शिसा व एका हातात पिशवी घेतलेला तो चिंगीचा अवतार पाहून ती म्हणाली,

" अगाई ! आज बाजार चिंगूताईकडे आला जणू ! नि रामजा गडी कुठे ग्येला ? "

" घरी आहे की तो. "

मग घरी गेल्याबरबर त्येला द्या धाडून मंडईत. आज कोबी नि फळावर अश्शी चकोट आणल्यात. येरवाळी ये म्हनावं, नायतर जातील सरून नि मग यायचा त्यो नासकं कुचकं घ्यायाला. "

" मग गंगाबाई, माझ्यापाशीच का देत नाही तुम्ही ? मी जाईन की घेऊन. "

" खरं म्हनतायसा ? पर नेनार कसं तुमी ? तुमच दोनी हात अवघडल्याल. "


" ही पिशवी मोकळीच आहे. ह्यातनं नेईन मी. "

गंगा माळणीला चिंगीचे म्हणणे पटले. तिने दोन कांदे तिच्या पिशवीत घातले. पाणी थबथबत असलेले कोबीचे कांदे वाग्भट-सुश्रुताची खराबी करतील ही कल्पना चिंगीच्या आणि गंगाच्या डोक्यातच आली नाही.

तो सगळा बाजार घेऊन चिंगी रमावैनींच्या घरात शिरली. पण त्या घरी कोठे होत्या ! त्या परत येईपर्यंत वाट पाहात बसणे तिला भाग पडले. पण तेथे बसणे तिला कंटाळवाणे झाले नाही. कारण रमावैनींचे विष्णुअण्णा अंगणात गाईची धार काढीत होते आणि त्या वेळी गाय वासराला चाटीत होती. वासरू गाईच्या गळ्यातील पोळी चोखत तिला ढुशा मारीत होते तो देखावा चिंगीला मोठा मौजेचा वाटला. तिने हातातले जिन्नस खाली ठेवले आणि गायवासरू जवळून पाहाण्यासाठी म्हणून ती गव्हाणीकडे निघाली.

गाईला गरीब म्हणतात, पण गाईसारखे बुजरे आणि खट्याळ जनावर दुसरे नसेल. विष्णुअण्णांची गाय त्यापैकीच होती.

अण्णाबरोबर ती गरीबपणाने वागली तरी दुसऱ्या कोणी तिच्या वाटेला जाण्याची सोय नव्हती. छत्रीप्रमाणे काळ्या कपड्याला ती बुजे आणि आज चिंगी काळ्या कापडाचेच परकर पोलके नेसून तिच्याकडे निघालेली. मग काय विचारता? तिने फुस करून टाण्दिशी उडी मारली आणि दावे तोडून चिंगीवर धावून जाण्याची तिची धडपड सुरू झाली. ह्या धडपडीत अण्णाचे धार काढणे तर बंद पडलेच पण काढलेले दूधही लवंडून गेले.



इकडे चिंगीही भेदरून मागे सरली. तिच्या धक्क्याने तेलाचा शिसा पिशवीवर लवंडला आणि चिंगी शिशावर आदळली. वाग्भट, सुश्रुत पाण्याबरोबर तेलातही भिजले आणि चिंगीच्या दणक्याने शिशाने राम म्हणून आपल्या काचा चिंगीच्या हातात आणि मांडीत घुसवल्या. तेल पाण्याबरोबर रक्ताचाही संगम झाला.

आता धारेपेक्षा चिंगीच्या वेदनांकडे लक्ष देणे विष्णुअण्णांना भाग होते. त्यांनी आपल्या बुद्धीप्रमाणे तिच्या जखमांना प्रथमोपचार

केले आणि एक टांगा बोलवून चिंगीला जवळच्या सरकारी इस्पितळात नेले. तेथे तिच्या जखमा धुवाय-बांधायला चांगले बारा वाजून गेले.

रमावैनींना निरोप सांगून चिंगी अजून का आली नाही ह्या फिकिरीत डॉक्टरीणबाई पडल्या, पण 'बसली असेल त्यांच्या मुलांत खेळत नि रमावैनींनी जेवून जा म्हटल्यावर बसली असेल जेवायला,' अशी समजूत घालून डॉक्टर एकटेच जेवायला बसले. चार घास खाऊन पाण्याचा घोट घेताच त्यांच्या हातातले भांडे जवळजवळ गळून पडले. वेडेवाकडे तोंड करीत त्यांनी बायकोला विचारले, "म्हणजे ह्याचा अर्थ काय?"

"काय झालं?" डॉक्टरीणबाई बावरून म्हणाल्या.

"खारं पाणी प्यायला का ठेवलं?"

"ह्या चिंगिट्लीचा कारभार हा!"

पण हे बोलणे दुसऱ्याच निमित्ताने थांबले. पलीकडल्या दुर्गाक्का तणतणताना ऐकू आल्या.

"घरचा चोर असला पाहिजे कुणीतरी वैनी." दुर्गाक्का आमच्या हिच्यापुढे फिर्याद मांडीत होत्या, "अहो त्याशिवाय का बघता बघता भांडी नाहीशी होतील? कळशी भरेपत्तर नळाचं पाणी गेलं. कळशी आत ठेवून येते तंवर भांडी नाहीत! डाक्टरीणबाईंची भांडीही होती नळावर. पण तीही नव्हती मी परत आले तेव्हा."

"अहो, सापडतील आत्ता नाहीतर अंमळशाने; नजरचुकीने होतो जिन्नस इकडचा तिकडे. चोरतंय कोण? नि चोरीच करायची तर असल्या चारआठ आण्यांच्या जिनसाची कशाला करील कोण?" हिने दुर्गाक्कांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

डॉक्टरीणबाईंनी भांड्यांच्या घडवंचीकडे नजर टाकली तों चिंगीचा पराक्रम त्यांच्या दृष्टीला पडला. त्या अगदी केविलवाणी चर्या करून उद्गारल्या,

" आता जीव द्यायची पाळी आली ह्या चिंगिट्लीच्या पायात. पाणी भरून आणायला सांगितलं, खारं पाणी आणलंन्, भांडी आणायला सांगितलं, आणलीन् असतील नसतील ती. फुकटात चोरीचा आळ. माझीच अक्कल गेली चुलीत त्याचं फळ मिळतंय् हे ! नळाचंच पाणी नि आपलीच भांडी आण असं म्हणायला काय झालं होतं मला ! ही कार्टी किती गुणाची आहे हे मला समजलं असतं तर कशाला झाली असती अशी शोभा ? येऊ दे आता म्हणजे डाग देते कार्टीच्या हाताला. "

" तेवढं नका आणिक करून ठेवू " डॉक्टर म्हणाले, " तिच्या हाताला दिलेले डाग निस्तरावे लागतील मलाच. "

त्याच वेळी पट्टया लपेटलेली चिंगी आणि तिचा भिजका बाजार घेऊन विष्णुअण्णा दाखल झाले.

" संभाळा डॉक्टरसाहेब हे आपलं कन्याधन " विष्णुअण्णा म्हणाले आणि त्यांनी सर्व प्रकार सांगितल्यावर डॉक्टरीणबाई तिला जवळ घेऊन भीतिग्रस्त सुरात म्हणाल्या,

" कशाला ग हवी होती तुला ही उसाभर ? काही नि बाईच करून ठेवतीस बघ. "

" एका कामात चार कामं करणार होते मी शारदेसारखी." आणि सर्व मंडळी निघून गेल्यावर चिंगी म्हणाली, " आई, अण्णांची गाय वासराला मायेने चाटते. माणसं चाटतात का ग तसं आपल्या मुलांना ? "

डॉक्टरीणबाई गालातल्या गालात हसून म्हणाल्या, " स्वस्थ पड बघू आता. "

—*—

# लग्नघरात चिंगी

चिंगीच्या चुलत बहिणीचे लग्न ठरले. घरचे कार्य असल्यामुळे डॉक्टरांना सहकुटुंब सहपरिवार जाणे भाग होते. लग्न बुधवारी होते तेव्हा आदल्या सोमवारी सकाळच्या गाडीने निघायचा बेत ठरला. गावाला जायचे म्हणजे मुलांच्या हौसेची गोष्ट. चिंगी त्या नादात अगदी गुंग होऊन गेली होती. काकांच्या मन्याला आणि वासंतीला आपल्या कोणकोणत्या जमती दाखवायच्या ते तिने मनाशी ठरवले होते. कापडाच्या ताग्यावरची जमवून ठेवलेली चित्रे, मालीला पेणसली देऊन तिच्याकडून घेतलेल्या शिंपा, किल्ली देताच डोळे फिरवणारी आणि मान डोलवणारी बाहुली अशा किती तरी चिजा तिने आपल्या पिशवीत भरून ठेवल्या होत्या.

मध्ये एकदा तिची मावशी येऊन गेली, त्या वेळी तिने आपल्या भाचीला जांभळी तांबडी फुले असलेल्या तलम पोपटी कापडाचा परकर आणि गुलाबी पोलके शिवले. ते घालून मिरवावे असे चिंगीला सारखे वाटायचे. पण तिची ही हौस डॉक्टरीणबाई पुरवायच्या नाहीत. नाही म्हणायला संक्रान्तीच्या दिवशी हलवा द्यायला जाताना, आणि किंक्रान्तीच्या हळदीकुंकवाच्या वेळी आपला हा आवडता पोषाख चिंगीला घालायला मिळाला होता. त्या वेळी

देवळातल्या अंबाबाईपुढे तिळगूळ ठेवताना चिंगीने नवस केला होता, 'आई अंबाबाई, आजच्यासारखी संक्रान्त रोज रोज येऊ दे म्हणजे मला नवीन परकर पोलकं घालायला मिळेल नि मग मी तुला रोजरोज तिळगूळ देईन.'

पण चिंगीच्या ह्या नवसाला अंबाबाई पावली नाही आणि संक्रान्तीच्या सणापासून तिचे परकर पोलके आईच्या बासनातच लपून बसले. आता लग्नाला गेल्यावर तरी आई ते घालायला देईल का, अशी शंका तिच्या मनात डोकावायला लागली. आई आपले आणि बव्याचे तेवढे कपडे ट्रंकेत भरते आहे असे पाहून आपल्या परकर पोलक्याची तिला आठवण करून दण्यासाठी चिंगी म्हणाली, " किनई आई, मावशीने मला शिवलंय् बव, तसलं परकर पोलकं आपल्याला पायजे असं गोपकाकाकूंना त्यांची किशी म्हणत होती. तेव्हा गोपकाकाकूंनी वासूच्या मुंजीत शिवीन म्हटलं. वाजत जाताना ते छान दिसेल नाही का ग आई ? "

चिंगीचा उद्देश डॉक्टरीणबाईंच्या लक्षात आल्याशिवाय का राहील ! चिंगीचे बोलणे ऐकून त्यांना हसू आले. पण ते दाबून त्या म्हणाल्या,

" किशीसारख्या शहाण्या नि गरीब मुलीला कसलेही कपडे छान दिसतात, पण तुझ्यासारखी पोरटी कित्ती सजवली तरी वेंधळीच दिसायची. चांगल्या जिनसांची विल्हेवाट लावायची तुझी खोड काय मला ठाऊक नाही ! दसऱ्याला दोरव्याचा झगा शिवला, तर दिवाळीच्या आत पोतेरं करून टाकलंस. म्हणून तुला काऽही करायचं नाही नि कुठे न्यायचंही नाही, असं ठरवलंय मी. आता सुमनच्या लग्नाला दिखील नेणार नाही आहे मी तुला. करायचंय्

काय असलं ध्यान नेऊन? कुठे कशा कडमडतील नि केव्हा कुणाच्या जिवाला घोरं लावतील ह्याचा नेम नाही. म्हणून मी नेत नाही तुला. आम्ही बाकीची मंडळी जातो, तू राहा इथे वैनींच्या जवळ."

आईचे हे बोलणे ऐकून चिंगीला रडू आले. ती मुसमुसत आणि झग्याला नाक डोळे टिपीत सोप्यावर जाऊन बसली. 'आपल्या कवितेत आई मायाळू असते, मुलांच्या मनाप्रमाणे वागण्यातच तिला सुख वाटतं असं किती किती आहे, पण आपली आई कुठाय् तशी? आपल्याला हवं तेच नेमकं ती करीत नाही. सुमनताईच्या लग्नाला ती मला नेत नाही, तर तिने एकटीने तरी का म्हणून जावं? तिची गाडी चुकू दे, नाही तर तिला तिकिटच मिळू दे नको, नाही तर आगगाडीचं इंजनच बंद पडू दे' अशा विचारांची तिच्या मनात मारे गर्दी उसळली!

पण थोड्याच वेळात आईने म्हटले ते खरे नव्हे, तिच्याबरोबर आपणालाही लग्नाला जायला मिळणार आहे ही गोष्ट चिंगीला उमगली. ती सोप्यावर उदास होऊन बसली होती त्या वेळी डॉक्टर बाहेरून आले. त्यांच्या हातात एक पुडके होते. चिंगीकडे लक्ष जाताच ते म्हणाले,

"बघितलंत का करवलीबाई तुमच्यासाठी काय आणलंय ते!"

ते काय आहे हे न दाखवताच डॉक्टर आत गेले. आता चिंगीला धीर कसा निघावा! डॉक्टरांच्या मागोमाग ती माजघरात गेली. पुडके उघडून दाखवीत ते डॉक्टरीणबाईंना सांगत होते,

"माणिक मिल्समध्ये जाऊन घेऊन आलो ही पाचवारी साडी. रंग, पोत आहे ना सारं मनासारखं? मुलांपेक्षा मुलांच्या आयाच

त्यांच्या कपड्यांचा सोस करतात. चिंगी झगा-परकरावर खूष आहे. पण तुम्हांला साडी नेसवून मुलीला मिरवायची हौस! ह्या तुमच्या हौसेसाठी पंधरा रुपयांचा भुर्दंड भरावा लागला मला."

"मी माझ्यासाठी थोडंच हे करतेय्? लगीनघरात दहा घरची दहा मुलं जमायची. ती नटूनसजून फिरणार. त्यांच्यापरीस चिंगी ही दिसली, तर इकडचाच कमीपणा दिसेल. ह्यासाठी माझी धडपड."

हौस पुरवून घेऊन दुसऱ्यावर उपकार केल्याचे श्रेय सर्वच बायका मिळवतात, तसे डॉक्टरीणबाईंनीही मिळवले. पण कसे का असेना, चिंगीला नवी साडी मिळाली व आईबरोबर आपणालाही लग्नाला जायला मिळणार ही तिची खात्री झाली. साडीच्या घडीला कुरवाळीत चिंगी म्हणाली,

"आणलेल्या दिवशी नव्या कापडाची घडी मोडली म्हणजे म्हूर्त बघावा लागत नाही असं त्या दिवशी मावशी म्हणाली."

"मग तुझ्या साडीची घडी तू आजच मोडून टाक चिंगे."

वडिलांचे हे शब्द चिंगीला कितीपण गोड वाटले! तिने मोठ्या हौसेने घडी हातात घेतली. पण तिच्या हातून ती हिसकवून घेत डॉक्टरीणबाई म्हणाल्या,

"आता नाही मोडायची घडी. लग्नाच्या दिवशी खासा मुहूर्त असतो, त्या दिवशी एकदा देईन नेसायला. चार दिवस तरी राहू दे झुळझुळीत. एकसारखं साडी साडी केलंस तिथे तर बघ. आधी इथेच बजावून ठेवतेय्."

डॉक्टरीणबाईंनी घडी ट्रंकेत आणि तीही अगदी तळात आपल्या लुगड्यापातळांखाली बसवून ट्रंकेला कुलूप लावले.

निघायच्या वेळी डॉक्टरीणबाईंनी चिंगीला बजावले,

“ मी तुला नेतेय्, पण लक्षात ठेव मला हे हवं नि मला ते द्या असं मागायचं नाही, कुठल्या जिनसाला विचारल्याशिवाय हात लावायचा नाही नि उगीचच्या उगीच कुठे कडमडायचं नाही. सांगीन ते मुकाट्याने ऐकायचं नि दुसऱ्या मोठ्या माणसांनीही काही करायला सांगितलं, तर नाही म्हणायचं नाही. व्रात्यपणा केलास तर बघ तुझं कसं करीन ते. ”

चिंगीने सगळ्या ताकिदी मुकाट्याने मान्य केल्या. आयत्या वेळी एका रोग्याची प्रकृती चिंताजनक झाली व त्याला सोडून बाहेरगावी जाणे डॉक्टरांना अशक्य झाले. म्हणून डॉक्टरीणबाई एकट्याच चिंगीला आणि बट्याला घेऊन भाऊजींच्या घरी दाखल झाल्या.

बोलूनचालून लग्नघर. निरनिराळ्या ठिकाणांहून निरनिराळ्या नात्यागोत्याची मंडळी जमली होती. मोठी माणसे होती, तशी मुलेही होती. मोठी मंडळी कामात गुंतली होती. मुलांना खाण्या-खेळण्या-वाचून आणि भांडण्या—रडण्यावाचून उद्योग नव्हता. तान्ही लेकरे आपल्या वडील भावंडांच्या गळ्यात अडकली होती आणि वडील भावंडांना त्या लोढण्यांचा त्रास होत होता. बट्या आता दोन अडीच वर्षांचा झाला असल्याने चिंगीचे आंग सोडून खेळत होता. काकूंच्या वैनींच्या लिलीशी चिंगीची गट्टी जमली होती आणि तिच्याशी खूपखूप खेळून घ्यावे असे चिंगीला वाटत होते. पण लिलीच्या कडेवरला मध्याचा लादा खाली ठेवायची सोय नव्हती. खाली ठेवला रे ठेवला, की मधोबा किंचाळायला लागत आणि त्यांची किंकाळी ऐकू गेली, की काकूंच्या वैनी येऊन लिलीवरच कडाडत, “ कार्टे, नुसतं बाळाला सांभाळणं होत नाही होय ग तुला ? घेतलंस त्याला घटकाभर कडेवर तर झिजशील की काय तरी ? आता येऊ दे त्याचा सूर ऐकायला म्हणजे बघ तुझं काय होईल ते. ”

" आमच्या आईचं सदान् कदा असंच. आमच्यावर कावायचं जेवातेवां " लिली रडकुंडीला येऊन म्हणायची आणि चिंगी तिचे सान्त्वन करायची.

" सगळ्यांच्याच आयांचं असतं असं. आमचा बट्या एवढासा असता तर मालादिखी आमची आई असंच म्हणाली असती नि त्याला का रडवलंस म्हणून धपाटा घातला असतान्. मागे किनई, त्याला मी जोश्यांच्या कुत्र्यावर बसवायला गेले नि ते कुत्रं एकदम पळालं नि बट्या पडला. फार नव्हतं काही त्याला लागलं. कपाळाला जरासं खरचटलं. तर आईने गालगुच्चा घेतला कित्ती जोराने. "

केळवणाच्या पंक्तीत सुमनताईला रंगीत पाट आणि चांदीचे ताट ठेवल होते. चिंगीला वाटले ' आपणालाही तसं का नसावं ! काका-काकूंना विचारावं त्याबद्दल.' पण कोणापाशी काही मागायचे नाही ही आईने दिलेली ताकीद तिला आठवली. तिला त्यातल्या त्यात समाधान वाटायसारखी एक गोष्ट होती, ती म्हणजे सुमनताईशेजारचे पहिल्या नंबरचे पान तिला मिळाले होते आणि तेही कसले तरी फाटकेतुटके नसून अगदी धड आणि लांबरुंद. तिच्या समोरच बसलेल्या लिलीला एक लहानसा फाळका ठेवला होता आणि तोही मध्ये फाटलेला; पण लिलीला पानाची ऐट दाखवायची सोय नव्हती. कारण ती नेसली होती नवा कोरा जरीचा परकर, आणि चिंगीचा रोजचा परकर अद्यापि सुटला नव्हता. सकाळी आंग धुतल्यावर तिने नवी साडी, निदान मावशीने शिवलेला परकर आईकडे मागितला होता, पण ' आत्ता नाही, अक्षतीच्या वेळी बघू ' असे म्हणून आईने तिच्या हौसेवर विरजण घातले होते.

काही मनासारख्या तर काही मनाविरुद्ध गोष्टी घडत होत्या. मनाविरुद्ध झाले तरी तासन्तास धुसमुसत बसायचा चिंगीचा स्वभाव

नव्हता. ती आपली निराशा झटकन् विसरते आणि आहे त्यातच रमून जाते. लिलीसारखे नटायला मिळाले नाही म्हणून रंजीस व्हायच्याऐवजी आपणाला पहिल्या नंबरचे पान मिळाले, समोर उदबत्तीची सोंगटी ठेवली, आणि सुमनताईच्या चांदीच्या गडव्यातले पाणी जेवताना आपणाला ओतून घ्यायला मिळणार ह्या आनंदात चिंगी गर्क होऊन गेली. पण हे समाधानही तिला मिळायचे नव्हते. ह्याच नेमक्या वेळी खेळता खेळता बट्या पायरीवरून पडला आणि त्याने भोकाड पसरले. आईने सोवळे नेसून वाढायला घेतले होते, आणि दुसरी माणसे उचलून घ्यायला गेली तर बट्या कोणाला हात लावू देईना. अर्थात् चिंगीला उठावे लागले, आणि त्याला घेऊन उगा करीपर्यंत इकडे 'पार्वतीपते' होऊन पंगत बसली सुद्धा. चिंगीने पंगतीकडे पाहिले तो तिच्या पानावर लिली येऊन बसलेली ! लिलीची गट्टी फू करायची आणि तिच्याशी कध्धी कध्धी बोलायचं नाही असे चिंगीने ठरवून टाकले.

जेथे आपला इतका विरस झाला, त्या पंगतीकडे बघू सुद्धा नये असे चिंगीला वाटले असल्यास नवल नाहीं. ती मागील दारी गली बट्याला घेऊन. तेथे तुळशी कट्ट्यापाशी तिची म्हातारी आजी देवदेव करीत बसली होती. आजीचे सोवळे भारी कडक. तिच्या पूजेच्या वेळी तिला ओवळ्या माणसाची सावली सुद्धा खपायची नाही. आणि आजीचा दुसरा नियम असा, की पूजेच्या वेळी ती बोलायची नाही. चिंगी आणि बट्या जवळ येताना पाहून जवळ यऊ नका अशी तिने खूण केली आणि बोटांनी तोंडात घास घातल्याचा आविर्भाव करीत बाहेरच्या मांडवाकडे बोट दाखवले. तिकडे पंगत बसली आहे, तुम्हीही जेवायला जा असे दर्शविण्याचा आजीचा हेतू होता. पण चिंगीला वाटले, आजीला फार भूक लागली

असून ती काहीतरी खायला आणायला सांगते आहे. चिंगी पंगतीत गेली आणि गोपूकाका लाडू वाढीत होते त्यांना हलकेच म्हणाली,

" आजीन लाडू मागितलेत. देता ? "

गोपूकाकांनी दिलेले दोन लाडू घेऊन चिंगी परत आली ती आजीला जाऊन भिडली. तिच्या सोवळ्याची तिला काय कल्पना ? आजीच्या पूजा-पात्रात लाडू ठेवून चिंगी म्हणाली,

" हे खा, तवर पाणी घेऊन येते प्यायला. "

विटाळ झाल्याबद्दल आजीचा कडकडाट सुरू झाला. तो ऐकताच वाढप जेथल्या तेथे ठेवून चिंगीची काकू व आई धावून आल्या. सासूबाईंच्या रागाचा भारी धाक वाटे त्या सुनांना. त्यांना पाहाताच म्हातारीचा हल्ला त्यांच्यावर सुरू झाला,

" तुम्हीच सोवळंओवळं गुंडाळून ठेवायला लागला, मग पोरांना कसं लागणार वळण ! करायचीच ती भ्रष्टाकार, आता पुन्हा आंग धुवायचं नि ओलेत्याने पूजा नि जप करायचा. जीव नकोसा होऊन जातो ह्या कर्मकटकटीत. "

चिंगीच्या उपद्व्यापापायी आपल्याला बोलून घ्यावे लागल्यावर डॉक्टरीणबाई संतापल्याशिवाय कशा राहातील ! त्यांनी दंडाला धरून लेकीला गदागदा हालवले आणि तिच्या पाठीत धपकन् धपाटा घालून म्हटले, " इथे कशाला कोसळलीस कार्टे ? "

चिंगी कळवळली.

म्हातारी आजी चिंगीच्या सुटकेला धावली आणि तिला आपल्या हाती घेऊन सुनेला म्हणाली,

" आई आहेस की कोण आहेस तू ? तुम्हा हल्लीच्या बायकांची ममता कुठे मुलखावर गेली म्हणते मी ! तरी बरं, सख्खी लेक आहे.

म्हातारी भुकेने कळवळली असेल म्हणून कीव आली पोरीला, त्याचं कवतिक कराल की गुरागत धोपटीत सुटाल ?"

"पण नातीच्या ह्या कनवाळूपणाबद्दल पहिल्यांदा आकाश-पाताळ एक झालं होतं." डॉक्टरीणबाई असे पुटपुटत जाऊबाईसह आत चालत्या झाल्या.

चिंगी अद्यापि जेवली नाही हे कळल्यावर तर तिचा कळवळा आजीला अधिकच आला. नातीने आणलेले दोन्ही लाडू आजीने चिंगीलाच खाऊ घातले. आजीनातीचे बोलणेही चालले होते त्यावेळी.

"आजी, तुला भूक लागली असेल. आमच्याबरोबर तांदुळ-पिठलं खायलाही बसली नव्हतीस."

"अहा ग शाहाणे ! आमच्यासारख्या म्हाताऱ्यांनी पारोश्यानी खरकटं खायचं ?"

"तू खात नाहीस म्हणूनच इतकी रोडली आहेस."

"मग एखादं पौष्टिक दे की आणून बापापासनं."

"किनई आजी, आमच्या डॉक्टरांचं एक छान औषध आहे. ते रोज घेतात सकाळी. नि आईला सुद्धा त्यांनी दिलं मागल्या महिन्यात, तिचा ताप बरा झाल्यावर. नि बरं का ग आजी, ते तुला आपलं आपण सुद्धा घ्यायला येईल. मापभर दुधात एक घालायचं, नि पिऊन टाकायचं. तीन पैशाला एक मिळतं."

"अग पण पोरटे, ते एक म्हणजे काय ते सांग की ?"

"कोंबडीचं अंडं !"

आपले चिरंजीव आणि सून सुद्धा अंडी खाऊन भ्रष्टाकार करतात ह्या माहितीने आजींच्या आंगाचा तिळपापड झाला. असली बाटगी सून ज्या स्वयंपाकात विटाळ कालवते त्यातला घास तरी ती म्हातारी तोंडात घालील !

बायकांच्या पंगतीच्या वेळी सूनबाई सासूबाईंना बोलवायला आल्या. " मला जेवायचं नाही, " हे एकच उत्तर मिळाले. का म्हणून विचारले तर म्हातारी म्हणाली, " तुम्ही विचारू नका नि मी सांगायची नाही. अभद्र गोष्टी उच्चारायच्या नि जीभ विटाळून घ्यायची. हवंय कशाला ! "

आजी आपला अन्नसत्याग्रह मागे घेण्याचे लक्षण दिसना. त्यांच्या चिरंजीवांनी आणि इतरेजनांनी आर्जवांची शिकस्त केली पण रामा शिवा गोविंदा. मुलांना हट्टी म्हणून माणसे नावे ठेवतात, पण म्हातारी माणसे हट्टाला पेटली तर त्यांच्यापुढे कोणाचीही मात्रा चालत नाही हे आजींनी त्यावेळी सिद्ध करून दाखवले.

चिंगीचाच हा काहीतरी उपद्व्याप असेल अशी डॉक्टरीण-बाईंना शंका आली. त्यांनी चिंगीला विचारून घेतले तेव्हा आजींच्या रागाचा उलगडा झाला. सर्वांनाच मौज वाटली त्याची आणि मग उपाध्येबुवांनी मध्यस्थी करून त्यांची समजूत केली. देवक बसले असल्यामुळे विटाळ आणि शिवाशीव कशाचीच होत नाही; कार्य उरकल्यावर अभक्ष्यभक्षणाबद्दल प्रायश्चित्त देऊन डॉक्टरीणबाईंना शुद्ध करून घेता येईल ह्या अटीवर तह झाला.

एक प्रहरभर तरी चिंगीने केवढा गोंधळ उडवला ! कोठून आणले हे ध्यान आपल्याबरोबर असे होऊन गेले डॉक्टरीणबाईंना. त्यांनी तिला आणखी दोन चापट्या लगावून म्हटले, " घरातलं काही सांगू नये असं हजारदा बजावलं तरी लक्षात राहात नाही मेलीच्या ! "

पण हा घोळ काहीच नव्हे असा घोळ चिंगीने दुसऱ्या दिवशी निर्माण केला.

रुखवत घेऊन वधूपक्षाकडील बायका वरमंडपात गेल्या. नवरदेवांना घेऊन येण्यासाठी एकदोन पुरुष मंडळीही गेली. नवरदेवांना घोड्यावर

बसणे जमणार नाही म्हणून टांग्याची व्यवस्था केली होती. जाताना टांगा रिकामा होता आणि त्यात चलाखी करून लिली, किशा, बंड्र, तारा अशा मुलामुलींनी जागा पकडली होती. चिंगीने त्यात शिरकाव करून घेण्याची धडपड करून पाहिली पण ती साधली नाही. तिला चालत जावे लागले. त्याची भरपाई करून घ्यायची आणि लिलीने आपल्याला टुकटुक दाखवली तशी तिला दाखवायची हा एकच विचार तिच्या मनात ठाणे देऊन बसला. वरघरी रुखवत वाढताना बब्या चिरचिरायला लागला तेव्हा डॉक्टरीणबाई म्हणाल्या, " चिंगे, ह्याला जरा बाहेर घेऊन जा बघू. बाहेर वाजंत्री आहेत, नक्षत्रमाळा आहेत, टांगा आहे, घोडं आहे, दाखव जा त्याला मजा. जा हं बाबू ताईबरोबर. ती तुला झा झा दाखवतीय, टांग्यात बसवतीय...."

रुखवताची जंमत बघायची बुडाली. चिंगी अधिकच रंजीस झाली. तरी पण टांग्याकडे आधी यायला मिळाले हे एकपरी बरेच झाले असे तिला वाटले. सर्वांआधी टांग्यातली जागा पकडायला मिळणार ह्या आनंदात ती बाहेर येऊन पाहाते तो काय? वरपक्षाकडील मुलांनी टांगा गच्च भरलेला.

" ए, उतरा रे खाली. आमच्या बाळाला बसवायचंय्."

" आम्ही नाही उतरत जा. आम्ही बापूरावांबरोबर लग्नाला जाणार टांग्यातून."

" पण टांगा आम्ही आणलाय. तुम्ही कोण बसणार त्याच्यात?"

" तुम्ही आणलात म्हणून? नवऱ्यासाठी आणलाय टांगा. नवऱ्याकडल्या माणसांनी बसायचं त्यात. नवरीसाठी आणला टांगा म्हणजे बसा खुशाल तुम्ही."

चिंगीला काय बोलावे ते समजेना. पण ती म्हणाली, " अरे पण, नवरा निघाला मंजे बसा की तुम्ही. तोपर्यंत बसवते मी बब्याला."

तिचे हे म्हणणे मुलांनी मान्य केले. बव्याला त्यांनी आपल्यांत बसवून घ्यायचे कबूल केल्यावर, "तो एकटा नाही बसायचा. त्याला घेऊन मला बसायला पाहिजे" असे म्हणून ती टांग्यात बसली सुद्धा. टांगेवाला वाजंत्र्यांबरोबर गप्पा मारण्यात गुंग होऊन गेला होता आणि इकडे आपल्या टांग्याची दशा काय झाली ह्याची त्याला शुद्धही नव्हती. चिंगीने रेटारेटी करीत मागून पुढे प्रवेश केला, तेथे चाबूक खोवून ठेवला होता तो काढून घतला आणि चाबूक हातात आल्यावर तो फडकावल्यावाचून तिला थोडेच चैन पडणार ? तोंडाने चक्‌चक् आवाज काढून तिने घोड्याला हलकेच एक फटकारा लगावला !

विजेच्या झटक्याप्रमाणे त्या फटकाऱ्याने घोडे चमकले आणि चौक धावत सुटले. कसे सुचले चिंगीला कोणाला ठाऊक, पण कडीला गुंडाळलेल्या लगामाच्या वाद्या तिने आपल्या हाती घेतल्या आणि घोडे थांबण्यासाठी ती त्या खेचू लागली. पण तिच्या ताकदीला का दाद देणार ते जनावर ! घोडे बेफाम सुटले. टांगा आपल्या आंगावर येईल ह्या भयाने सडकेवरले लोक बाजूला सरू लागले. भर बाजार पेठेतून टांगा खडखडत गावाबाहेर गेला. आतली पोरे भेदरून गेली. त्यांचा आक्रोश सुरू झाला. शेकडो जणांनी तो देखावा पाहिला पण आडवे होऊन घोडा अडवण्याची हिंमत कोणाला झाली नाही. घोडे टांगा कोठे तरी नेऊन घालणार आणि त्यात ह्या कच्च्याबच्च्यांचा चुराडा होणार अशी अशुभ भविष्ये वर्तवून प्रत्येकजण हळहळत मात्र होता.

टांगा मुलांना घेऊन उधळलेला पाहून लग्नघरातही ओरडा सुरू झाला. टांगेवाला आणि पाचदहा मंडळी तो धरायला धावली. कोणाची मुले टांग्यात होती ह्याचा शोध सुरू झाला आणि जमलेले

आईबाप आपापली मुले हुडकू लागले. ज्यांना आपली मुले दिसेनात, त्यांच्या तोंडचे पाणी पळाले. मुहूर्ताचे अवधान कोणालाच राहिले नाही. मुले सुखरूप घरी कशी येतील ह्या विवंचनेत सर्वजण चूर होऊन गेली. चिंगी आणि बव्या टांग्यात होती ही बातमी कोणी तरी डॉक्टरीणबाईंना सांगितली आणि त्यांच्या डोळ्यांतून गंगायमुना पाझरू लागल्या.

गावाबाहेर येताच घोड्याला नवे अवसान आल्यासारखे झाले. ज्या स्टेशनच्या रस्त्यावरून ते रोज दोनदा तरी जात येत होते, त्याच रस्त्यावरून ते आता आले होते आणि रोजच्या सारखीच हीही खेप आहे असे वाटून की काय, दौड वेगात सुरू होती. कोसभर टांगा जाईपर्यंत कसलाच व्यत्यय आला नाही. मग मात्र समोरून मोटार सायकलवर बसून आलेल्या लष्करी पोषाखातल्या एका गृहस्थाने टांगा अडवला. टांग्यात नुसती मुले असून त्यांचा आक्रोश सुरू आहे हे पाहून ह्यात काहीतरी घोटाळा आहे हे त्यांनी ताडले आणि त्यांनी आपली गाडी आडवी घातली. घोडे बाचकले, पण बाजूला वळून ते धावायला लागायच्या आत त्यांनी उडी टाकून लगाम पकडला. टांगा उभा राहिला. मुलांना उतरून घेऊन त्यांनी त्यांना उगी केले.


"बाळांनो, तुम्ही कुणाची कोण नि कुठे चालला होता ?"

चिंगीने झाली तशी सर्व हकिगत सांगून म्हटले, "ही मुलं उगीच भितात. मी काही भ्यायले नाही. मी धरून ठेवली होती वादी अगदी घट्ट. मग जाणार कुठे हे घोडं ?"

"पण तुम्ही कुणाची मुलं ? तुमच्या वडलांचं नाव काय ?"

"मी नाही सांगत. आपल्या घरचं काही सांगायचं नाही असं आईने सांगितलय् मला."

त्यांचे असे बोलणे चालले होते, तो दोन टांगे तेथे येऊन दाखल झाले. उधळलेल्या टांग्याचा पाठलाग करायला आलेलीच मंडळी होती ती. सर्व मुले सुखरूप आहेत असे पाहून प्रथम वाटणारी भीती आणि राग ही पळाली.



सर्वजण झालेल्या गमतीबद्दल हास्यविनोद करीत घरी आली. दोन तासांनंतरच्या दुसऱ्या मुहूर्तावर लग्नसमारंभ साजरा झाला. ज्याचा शेवट गोड ते सर्वच गोड असे म्हणतात, त्याप्रमाणे सर्वजण चिंगीच्या टांगाप्रकरणाची मौज आठवून हसत होते. डॉक्टरीणबाईही मनातून चिंगीच्या खट्याळपणावर चिडल्या असल्या, तरी त्यांनाही सर्वांबरोबर हसावे लागत होते.

# चिंगीचा प्रवासी विक्रम

लग्नसमारंभाहून घरी परत येताना आगगाडीत चिंगीने जो प्रकार केला त्याबद्दल तिची तारीफ झाली तरी प्रथम तिला आईच्या हातचे दोन धपाटे खावे लागले. काकांनी आपल्या वैनींना म्हणजे चिंगीच्या आईला चिंगी-बब्यासह बायकांच्या डब्यात बसवले. डब्यात गर्दी होती आणि त्यांना जेमतेम बसण्यापुरती जागा मिळाली. पण चिंगीने हलके हलके खिडकी गाठलीच. खिडकी पकडून बसलेल्या एका गुजराती बाईला चिंगीची ही रेटारेटी रुचली नाही आणि तिने कपाळावर आठ्या चढवून डॉक्टरीणबाईकडे पाहिले.

"चिंगे, मागे सरक बघू मुकाट्याने. त्यांना नको त्रास देऊ." त्यांनी दटावले.

"पण आई, मी त्यांना कुठे त्रास देते आहे? मी नुसती खिडकीतनं बाहेरच्या गमती बघतेय्."

"कसल्या गमती आहेत ग बाहेर? ये इकडे."

"माणसांनी पुष्कळ प्रवास करावा नि प्रवासात पुष्कळ बघून घ्यावं असं आमच्या बाई म्हणतात. आणखी बाईंनी सांगितलंय्, की आपण बघितलेलं आपल्याला कळलं नाही तर मोठ्या माणसांकडनं ते समजून घ्यावं. किनई आई, आत्ता इथून एक बाई गाढवावर बसून गेली ती ह्या गुजरीणबाईसारखीच दिसली बघ. ह्यांची बहीणच असेल का ग ती?"

गुजरिणीला चिंगीचे मराठी बोलणे समजले की नाही कोणाला ठाऊक. पण डॉक्टरीणबाईंनी चिंगीला खसकन मागे ओढले आणि आपल्या शेजारी दाबून बसवीत म्हटले,

" डाग दिला पाहिजे कार्टे तुझ्या तोंडाला. आता इथनं उठलीस नि एक अक्षर बोललीस तर बघ. "

आपले काय चुकले ते चिंगीच्या ध्यानात आले नाही. ती रडक्या सुरात म्हणाली,

" भैणींचे तोंडावळे सारखे दिसतात असं वैनीनं सांगितलं परवा, तू नि मावशी सारख्या दिसता म्हणून, म्हणून मी विचारलं. "

" बरं बरं, समजली अक्कल. "

थोड्या वेळाने एक आंधळी भिकारीण डब्यात आली आणि तिने ' मीराके प्रभूचे ' एक गाणे म्हणून भिक्षा मागायला सुरुवात केली. तिच्या वाडग्यात कोणी दिडकी तर कोणी आणेली टाकली. सहज आठबारा आणे मिळाले तिला. दुसऱ्या स्टेशनवर उतरून भिकारीण दुसऱ्या डब्यात गेली.

" ह्या बाईचा गळा भारी गोड आहे, नाही ? किती छान गाणं म्हटलन् तिने ! " शेजारीच पुस्तक वाचीत बसलेली एक बाई डॉक्टरीणबाईंना म्हणाली.

" होय बाई. गायन क्लासात शिकून सुद्धा इतकं सुरेख गाणं म्हणायला यायचं नाही. "

" तुम्हाला येतं का गाणं म्हणायला ? " चिंगीने मध्येच त्या बाईंना विचारले.

" हो, येतं की साधारण. माझ्या शाळेत लहान मुलींना मीच गाणी शिकवते. "

" शाळा आहे तुमची ? " डॉक्टरीणबाईंनी विचारले.

" शाळा माझी नाही; पण एका शाळेत मास्तरीण आहे मी. हौस म्हणून गाणीही शिकवते मी. "

" पगार बरा मिळत असेल मग !"

" छे हो, खासगी शाळेत कुठला आलाय पगार? पंचवीस रुपये मिळतात मला महिन्याला."

" महिना म्हणजे तीस दिवस नि तीस दिवसांना पंचवीस रुपये? मंजे रोज रुपया दिखील नाही. मग बाई, तुम्ही भिकारीणच का नाही होत? ह्या भिकारणीला एवढ्याशा वेळात बघा किती पैसे मिळाले! नि आंधळी आहे."

" चिंगिटले, फाजीलपणाने बोलू नको म्हणते ना! करू तरी काय आता या कार्टीच्या तोंडाला?" डॉक्टरीणबाई चिंगीचे गालगुच्चे घेत कातावल्या.

त्यांचा हात मागे खेचून मास्तरीणबाई म्हणाल्या,

" छे छे. असं करू नये बाई मुलांना. मुलं आपल्या मनात येतं ते स्पष्ट बोलून दाखवतात. त्यात त्यांच्या मनात वाईट हेतू मुळी सुद्धा नसतो. नुसती चौकस बुद्धी असते. वडील माणसांनी त्यांच्या बोलण्यावर रागावण्याऐवजी त्यांच्या प्रश्नाची उत्तरं देऊन त्यांना शहाणं करावं. असं दटावलं किंवा कावलं म्हणजे मुलांची जिज्ञासा मंदावते नि ती बुजरी बनतात."

" अहो पण बाई, मुलांच्या जिज्ञासेला तरी काही सुमार हवा ना? एखाद वेळी एखादी गोष्ट विचारली तर माणूस उत्तर देईल. पण हे ध्यान असं आहे, की एक गोष्ट सांगून व्हायच्या आत दहा प्रश्नांची सरबत्ती करील नि काय विचारील ह्याचा नेम नाही. कालच हिने जावईबुवांच्या खिडकिडीत वडलांना विचारलं, 'नवऱ्यापेक्षा बायको लहान असती, मग तुमची बायको तुमच्या-परीस लठ्ठ कशी आहे' म्हणून !"

डॉक्टरीण आणि मास्तरीणबाईंच्या संवादात बट्याच्या रड्याने व्यत्यय आला. झोप चाळवल्यामुळे मुले किंचाळत उठतात, तसा बट्या उठला आणि त्याला उगी करण्याचा डॉक्टरीणबाईंचा प्रयत्न सिद्धीला जाईना. मास्तरीणबाईंनी संत्र्याचे आमिष दाखवून त्याला आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केला, पण त्या अनोळखी बाईचा हात लागताच त्याचे रडे अधिकच चवताळले. ते पाहाताच्न जागचे हालायचे नाही ही आईची ताकीद विसरून चिंगी उठली व आईच्या हातातून बट्याला घेऊन,

"च्यला हं. आपण आता भूल जाऊ या. मी आता घोला दाखवते हं माज्या बाबूला. ती बघ कशी झाडं पळताहेत नि ती बग कशी शिट्टी वाजतीय्! आपण इंजन बगायला जाऊ या हं आता...."

चिंगीच्या ह्या लडिवाळ बोलांनी बट्याचे रडे तर थांबलेच, पण त्याची कळीही खुलली. चिंगी गुजरीणबाईच्या खुषी नाखुषीचा विचारही न करता पुन्हा खिडकीपाशी घुसली आणि तिने दाखवलेल्या गमती पाहून बट्या टाळ्या वाजवू लागला.

एका स्टेशनवर गाडी थांबली आणि कडेवर मूल घेतलेली एक शूद्राची बाई डब्यात आली. ती दारातच आंग चोरून उभी राहिली. तिच्या कडेवरचे मूल गुटगुटीत होते. त्याच्या डोक्याचा गोटा केलेला होता. त्याच्याकडे बोट दाखवून बट्या उद्गारला,

"बाऽऽळ!"

चिंगीचे लक्षही त्याच्याकडे गेले आणि ती त्याच्याकडे हात करून चुटक्या वाजवू लागली. ते मूल खिदळू लागले आणि आपणाला घेण्याबद्दल त्याने चिंगीकडे हात पसरले. चिंगी बट्याला खाली ठेवून त्याला घ्यायला उठली. तिचा उद्देश डॉक्टरीणबाईंच्या लक्षात

आला आणि आपल्या मुलीने तसल्या हलक्या जातीच्या मुलाला घेणे बरोबर नाही ह्या समजुतीने त्या म्हणाल्या,

" कुठे ग चाललीस? बस जागेवर मुकाट्याने. गर्दीतनं जायचं नाही कुठे, पाय लागतात लोकांना."

" पण बघ तरी आई मी कशी जपून जाते ती." असे म्हणत चिंगी त्या बाईपाशी पोचली आणि ती 'नग, नग' म्हणत असतानाही तिने ते मूल घेऊन विचारले,

" ह्याचं नाव काय ग?"

" इटाबाई."

" विठाबाई! अय्या! मुलगी आहे ही! मग हिचं डोस्कं...."

" वा झाल्या वत्या, म्हनून भादरून टाकलं क्यास."

चिंगी त्या बाईबरोबर आणखीही बोलणार होती पण पुढच्याच स्टेशनवर ती उतरून गेली.

नाशिक स्टेशनवर तीनचार यात्रेकरू बायका डब्यात घुसल्या. त्यांनी दाराच्या वाटेवरच बोचकी ठेवून त्यांवर बैठक ठोकली.

त्यांतल्या एका बाईच्या चेहऱ्याकडे लक्ष जाताच चिंगी तिला म्हणाली,

" तुमच्याही केसांत उवा झाल्या होत्या होय?"

" नाशिक–पंचवटी–प्रयागक होगुदु."

चिंगीचा प्रश्न त्या कन्नड भगिनीला समजला नाही. ह्यामुळे डॉक्टरीणबाईंचा जीव भांड्यात पडला. पोरटीच्या भलत्यासलत्या बडबडीमुळे खवळली असती बाई तर घ्या काय!

त्यांनी चिंगीला ओढून घेऊन पुन्हा आपल्या शेजारी बसवले आणि मास्तरीणबाईंकडे पाहून म्हटले, "पाहिलंत ना कसा प्रकार चालतो हिचा! कुणाची कशी कळ काढील ह्याचा नेम आहे का?"



देवळाली स्टेशनवर सर्वांगावर गोषा घेतलेली एक बाई डब्यात आली. तिला पोचवायला एक मुसलमान गृहस्थ आला होता. गाडी सुटायच्या वेळेला तो तिला म्हणाला,

"आसनगामपर उतरो. फिर हुसेनभाईके मकानमे सामान रखो. कल पार्सल ट्रेनमे वापस आवो...."

त्या पांढऱ्या सफेत अभ्र्याखाली काय आहे हे चिंगीला समजेना आणि ते समजल्यावाचून तिला चैनही पडेना. ‘ पण तिकडे जायचं कसं ! जागेवरून उठलं तर आई रागावेल, मारील सुद्धा. ’ पण चिंगीचे कोडे आपोआप सुटले. जागा नसली तर कोठे तरी अंग चोरून उभे राहायची रीत त्या मुस्लिम भगिनीला मानवली नाही आणि तिने रेटारेटी करीत चिंगीच्या शेजारीच बैठक ठोकली.

चिंगीला आता स्वस्थ बसवेना. आपल्याकडे आईचे लक्ष नाही असे पाहून तिने हळूच तिच्या तोंडावरचे झाकण उचलले. त्या मुस्लिम बाईने चिंगीचा हात झिंजाटून टाकला, तो बाकाच्या मागील फळीवर आपटला आणि चिंगी कळवळली. हाताला येणाऱ्या झिणझिण्यांपेक्षा तिला दिसलेली गंमत तिच्या मनात अधिक भरली होती. ती आईच्या कानाशी तोंड नेऊन म्हणाली,

“ आई, मुसलमान बायकांना मिशा असतात होय ? ”

“ काही न् बाही विचारू नकोस ग. बायकांना मिशा ग कशा असतील ? ”

“ ह्या बाईला आहेत. दिसल्या मला. विद्येची शप्पत. ”

चिंगीचे हे बोलणे डॉक्टरीणबाईंनी मास्तरीणबाईंना सांगितले आणि दोघीही गालातल्या गालात हसल्या. पण डॉक्टरीणबाई-प्रमाणे मास्तरीणबाईंना ती गोष्ट हसून सोडून देण्याइतकी साधी वाटली नाही. बुरखेवालीकडे त्या लक्षपूर्वक पाहात राहिल्या.

गाडी थांबताच फिरकीचा तांब्या घेऊन मास्तरीणबाई उठल्या व पाणी आणायला खाली गेल्या. त्या परत आल्या त्या एकट्या आल्या नाहीत. त्यांच्याबरोबर गार्डही आला व त्या बुरखेवालीला म्हणाला,

"वेटिंग रूममे चलो."

बुरखेवाली जागची हालेना. आपल्यापाशी असलेले तिकीट तिने बुरख्यातून बोट बाहेर काढून दाखवले. 'तिकीट असल्यावर उतरायला सांगणारा तू कोण? औरत लोकांना त्रास घायचा तुला काय अधिकार!' अशी ती हुज्जत घालू लागली.

डब्याच्या तोंडाशी बघ्यांची गर्दी जमू लागली. तिला मागे सारीत पोलीस नाईक डब्यात आला. गार्डाने त्याला सर्व प्रकार सांगितला. पोलीस नाईक दरडावून म्हणाला, "सीधेपणाने आली नाहीस तर ओढून नेऊ. आम्ही तुझी बाया माणसांकडून झडती घेणार."

बुरखेवाली निघाली. डब्याबाहेर पडताच बुरखा दूर झाला आणि एक तरणाबांड जवान प्रकट होऊन त्याने धूम ठोकली. अडवायला येणाऱ्याला सुरा दाखवून त्याने बाजूला सारले. पण त्याची ही धडपड यशस्वी झाली नाही. दहापंधरा मिनिटांच्या पाठलागाने त्याला पकडण्यात आले.

आगगाडीत चोऱ्या करणाऱ्या टोळीपैकी तो एक होता. वात्यपणामुळे का होईना, पण त्याला पकडण्याचे श्रेय चिंगीला मिळाले होते आणि डब्यातल्या सर्वच सहप्रवासिनी चिंगीच्या चाणाक्षपणाचे कौतुक करू लागल्या होत्या. इतका वेळ तुसडेपणा करणारी गुजरीण आपल्या ट्रंकेवर पाय दाबीत म्हणाली, "जोखम घेऊन रेलमधी जायचा अने असला व्हायचा. बालाजीचा खैर अने छोकरी हुश्शार." टोपलीतून शेवगाठ्या आणि लाडू काढून तिने चिंगीला दिले.

"पण मास्तरीणबाई, तुम्ही कसं ओळखलं ती बाई नव्हे म्हणून?" डॉक्टरीणबाईंनी विचारलं.

" अहो, आधीच लक्षात यायला हवं होतं आपल्या. मुसलमान बायका पुरुषांपुढे गोषा पांघरतात. पण बायकांच्या डब्यात गोषाची गरज काय? ह्या चोराने आम्हां बायकांपुढे सुद्धा गोषा काढला नाही तेव्हाच आपल्याला संशय यायला हवा होता. पण आपण वेडपटासारखं नुसतं बघत राहलो. पण चिंगीने काढला दडलेला चोर बाहेर नि तुम्ही आपल्या लेकीला नावं ठेवता. चिंगीने त्याचं तोंड उघडं केलं नसतं तर कुणाचं तरी गाठोडं घेऊन होत होता तो पसार. "

आता चिंगीची स्तुती निमूटपणे ऐकून घेणे डॉक्टरीणबाईंना भागच होते.

गाडी सुटण्याची शिटी देण्यापूर्वी गार्ड व पोलीस नाईक डब्यापाशी आले व चिंगीला दारात बोलावून तिला शाबासकी देत म्हणाले,

" सहा महिने आम्हाला सतावणारा बदमाष आज ह्या छोकरीने पकडून दिला. बाई, आम्ही ह्या तुमच्या मुलीची आमच्या वरिष्ठाकडे शिफारस करणार आहो. तुमचं नि हिचं नाव आम्हांला कळेल काय? "

" माझं नाव चिंगी नि माझ्या आईचं नाव आई."

चिंगीच्या ह्या उत्तराने सर्वांना आणखी मौज वाटली.

# उलटे बक्षीस

" चिंगे, इथेच खेळ, नाही तर उधळशील कुठे तरी घर उघडं टाकून. मी जाऊन येते जराशी. नि हे बघ, घरात येऊ देऊ नको वाटेल त्याला. राहील ना ध्यानात ? "

मुलीला असे बजावून डॉक्टरीणबाई आपल्या एका मैत्रिणीच्या घरी गेल्या. चिंगीला असा एकान्त आज हवाच होता. तिने सिगारेटची रिकामी पाकिटे जमवून ठेवली होती आणि ती कातरून त्याचे कमळ करायचे तिने ठरविले होते. आईच्या शिवणसामानातली कात्री आणि पाकिटे घेऊन ती आपल्या कामाला लागली आणि त्यात ती अगदी गढूनही गेली. थोड्या वेळाने एक पुरुष आणि त्याच्यामागून एक स्त्री दरवाजातून येताना पाहून चिंगीने दरडावले,

" अहो, घरात यायचं नाही तुम्ही. "

" ते ग का ? "

" कुणाला घरात येऊ देऊ नको असं आईने सांगितलंय्. "

" अग पण पाव्हण्यांना येऊ देऊ नको असं नाही ना सांगितलं ? आम्ही पाव्हणे आलोय् डॉक्टरांच्या घरी. "

" पण पाव्हणे आले तर येऊ देत असं सांगितलं नाही आईने. म्हणून तुम्ही यायचं नाही आमच्या घरात. "

"अग पण बाळ, आम्ही खाऊ आणलाय् तुझ्यासाठी."

"मला नको तुमचा खाऊ."

"बरं, नको तुला तरं राहला. पण पाणी तरी देशील प्यायला ? भारी तहान लागलीय् बघ. पाणी पिऊन जातो आम्ही परत. जा, चांगलं गार पाणी घेऊन ये."

"मुळीच आणायची नाही मी. इथून हालायचं नाही अशी ताकीद दिलीय् आईने."

"तरी का हुईना. तू बैस आपली इथेच. मी जाऊन आणते आपली पाण्याचं तांब्याभांडं, मग तरी झालं ?"

"खुश्शाल आणा. पण आमच्या घरात न जाता वाट्टेल तिथनं आणा."

पण चिंगीच्या हरकतीला न जुमानता पाहुणे आत आतच सरकू लागले. आता ते सोप्यापर्यंत आल्याशिवाय राहात नाहीत असे पाहून त्यांना प्रतिकार करण्यासाठी चिंगी उठली व त्यांना मागे ढकलीत म्हणाली,

"येऊ नका म्हटलं तर काय म्हणून हो येताय् !" तुमच्या घरी कोण वाटेल ते आलं तर घाल का येऊन ?"

"तुम्ही ठेवा तिला धरून. मी आणते आत जाऊन पाणी."

"तूच ठेव हिला धरून. मी जाऊन येतो आत."

पाहुण्या बाईने चिंगीच्या दंडाला धरून आपल्याकडे खेचले. पाहुणा आत जाऊ लागला. त्याच्यापुढे आपले काही चालत नाहीसे पाहून चिंगीने आपले नैसर्गिक हत्यार काढले. पाहुणीच्या हाताचा तिने असा कडकडून चावा घेतला, की "अग आई ग ऽऽ !" अशी किंचाळी तिच्या तोंडून बाहेर पडली !



त्यासरशी घरात शिरू लागलेले पाहुणे दचकून मागे फिरले आणि चिंगीच्या तोंडचे बायकोचे मनगट सोडवण्यासाठी त्यांनी तिच्या पाठीत एक रपाटा हाणला.

चिंगी कळवळली. तिने मोठा गळा काढला.

“चला जाऊ या. मरू दे कार्टी.” पाहुणीच्या त्या सूचनेप्रमाणे पाहुणेही चालते झाले.

आई परत आली. चिंगीचे लाल झालेले नाकडोळे पाहून तिला वाटले, एकटे बसवून ठेवल्याबद्दलच चिंगीला रडू आले. ती म्हणाली, " रडून घेतलं वाटतं बाईसाहेबांनी ! सदान् कदा आईला शिवून ठेवल्या म्हणजे बयाबाई खूष ! एखाद दिवशी राह्यलं एकटं तर काय झालं ? ती गोपकाबाईंची यमी बघ. तुझ्यापरीस दोन वर्षांनी मोठी असेल फार तर. पण महिना महिना परगावी जातात गोपकाबाई तिच्यावर घर टाकून. नि आई घटकाभर दिसली नाही, तर तुझ्या गंगायमना वाहायला लागतात ! अजागळ मेली ! "

पण चिंगीच्या गंगायमुना खरोखर का वाहिल्या होत्या हे जेव्हा डॉक्टरीणबाईंना कळले, तेव्हा त्यांचा राग नाहीसा होऊन तिच्याबद्दल त्यांना कौतुक वाटू लागले आणि तिला जवळ घेऊन तिच्या पाठीवर ममतेने हात फिरवीत त्या म्हणाल्या,

" काय मेली माणसं असतात एकेक ! लोकांच्या घरी यायचं नि मुलाबाळांना मारहाण करून जायचं ! मेला कोण धटिंगण होता, कुणास ठाऊक ! "

त्याच वेळी डॉक्टर आले आणि बायकोला उद्देशून म्हणाले, " म्हणजे ! अजून नाही आली मंडळी ? एव्हाना यायला पाह्यजे होती. ती आली असतील म्हणून मी आलो पेशंटना वाट पाहात बसवून."

" कोण मंडळी यायची होती ? "

" माझा मित्र शामराव सहकुटुंब येणार होता आज. सकाळीच पत्र आलंय्. सांगायला विसरलो."

बायकोचा चेहेरा विचारात पडलेला पाहून डॉक्टर म्हणाले, " का ? अचानक पाव्हणे येणार म्हणून तुमचा काही कार्यक्रम फिसकटणार आहे की काय ? "

" आमचा कसला कार्यक्रम असायचाय्? पण पाव्हण्यांचाच कार्यक्रम फिसकटला की काय अशी भीती वाटतीय् मला. घटकाभराआधी कुणीसे पाव्हणे येऊन गेले...."

" गेले! कुठे?" डॉक्टर उद्गारले. चिंगीकडून कळलेली सर्व हकिगत डॉक्टरीणबाईंनी पतिराजांना निवेदन केली. ती ऐकून डॉक्टरही गोंधळात पडल. त्यांनी चिंगीला विचारले,

" पाव्हणे उंच होते की खुजे होते?"

" माझ्यापरीस उंच होती ती दोघंही "

" तसं नव्हे ग. पण किडकिडीत होते की लठ्ठ होते?"

" पाव्हणे किडकिडीत होते, पण बाई गब्दुल होती."

" काळे होते की गोरे?"

" अगदी गोरे नव्हते नि काळेकुट्टही नव्हते. बाई सुद्धा तशीच."

" शामरावच असण्याचा संभव आहे." डॉक्टर म्हणाले आणि सौभाग्यवतीला त्यांनी अहेर केला, " चकाट्या पिटत हिंडायची बायकांची खोड कमी होईल तर पुष्कळ भानगडी नाहीशा होतील जगातल्या. तुम्ही घरात असता तर कशाला झाला असता घोटाळा? खरोखरच शामराव आला असेल नि ह्या कार्टीने त्याला पिटाळून लावलं असेल तर शोधायचं तरी कुठे त्याला! नि इतकी हाणामारी नि चावाचावी झाल्यावर तो येईल का परत आपल्या घरी?"

चिंगीने पिटाळून लावलेले पाहुणे शामरावच असतील ह्या डॉक्टरांच्या शंकेला डॉक्टरीणबाईंनी दुजोरा दिला व तसे असेल तर त्यांना शोधून आणले पाहिजे असे त्यांच्या मताने ठरले. पण शोधून आणायचे म्हणजे तरी कोठून आणायचे? ह्या गावात शामरावांच्या

ओळखीचे दुसरे कोणी असेल असाही संभव नव्हता. मग काय ते परत स्टेशनवर गेले असतील? तसेही शक्य आहे. आपण येणार असल्याची प्रथम सूचना दिली असता डॉक्टरडॉक्टरीणबाईंनी घराबाहेर जायचे आणि मुलीकडून पाहुण्यांची हकालपट्टी करायची असा त्यांचा कटच असेल अशी शामरावांना शंका आली असेल व त्या रागाच्या भरात ते आल्या पावली परत गेले असतील, असे विचार त्या नवराबायकोच्या मनात डाचू लागले. अखेर मोटार-अड्ड्यावर व स्टेशनवर जाऊन काही शोध लागतो का पाहावे अशा इराद्याने डॉक्टर बाहेर पडले.

चिंगीने केवढा मोठा घोटाळा करून ठेवला हा! डॉक्टरीणबाईंना तिला खाऊ की गिळू असे होऊन गेले. पाहुण्यांचा प्रसाद तिला आधी मिळाला आहे ह्याची आठवणही त्यांना राहिली नाही. त्यांनी तिचे गालगुच्चे घेतले, पाठीत दोन धपाटेही घातले. बिचारी चिंगी मुळूमुळू रडण्यावाचून काय करणार! पण रडण्याचे स्वातंत्र्य तरी तिला कोठे होते! तिच्या रड्यावर तिच्या आईचा फिरून कडकडाट झाला.

आईच्या नजरेसमोर राहून घडगत नाही हे ओळखून चिंगीने परकराला नाकडोळे पुसले आणि बट्ट्याला उचलून घेऊन तिने परसात धूम ठोकली.

“खात्रीने शामरावच होता तो.” डॉक्टर घरी येताच हताशपणे म्हणाले.

“कशावरून?” डॉक्टरीणबाईंनी विचारले.

“साडेतीनच्या गाडीने एक जोडपं साताऱ्याची तिकिटं काढून गेलं असं स्टेशनमास्तरनी सांगितलं. त्यांतल्या गृहस्थाचं मास्तरांनी

केलेलं वर्णन अगदीं शामरावासारखं आहे. शामराव इथून साताऱ्यालाच जाणार होता."

"काय म्हणत असतील ती माणसं आम्हांला? आता जन्मात नाव काढायची नाहीत आमचं. कारण नसता वाईटपणा पदरात घ्यायला पाहिजे."

"कारण नसता कसं? असली नष्ट पोरटी पोटी आली हे काय लहानसान कारण आहे?"

"कारटीला कोंडून ठेवायचं तेवढं बाकी राहिलंय्. बाहेर पडली की दिवे लावल्याशिवाय राहायची नाही कधी."

शामरावाची समजूत घालून त्यांना परत बोलावून आणण्यासाठी कोणते उपाय करावे ह्याबद्दल नवराबायकोचा बराच विचारविनिमय झाला. झालेल्या प्रकाराचे सविस्तर पत्र लिहावे आणि तेवढ्यावर त्यांचा राग नाही शांत झाला तर डॉक्टरांनी शामरावांच्या गावी जाऊन त्यांना घेऊन यावे असा ठराव झाला.

पण डॉक्टरांना हा हेलपाटा घेण्याचे कारण पडले नाही. कारण दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर दवाखान्यात जायला निघतात तो शामराव आपल्या सौभाग्यवतीसह येऊन दाखल झाले. त्यांना पाहाताच डॉक्टर आश्चर्यचकित झाले. ते पाहून शामराव हसत म्हणाले,

"काल दुपारी येतो असे सांगून आज सकाळी आलो, ह्याबद्दल तुला आश्चर्य वाटायचं कारण नाही डॉक्टर. अरे, बायको बरोबर घेऊन फिरणाऱ्या कोणत्या नवऱ्याचा कार्यक्रम आखल्याप्रमाणे तडीला जातो?"

"तर तर! तुमची कालची गाडी काही माझ्यामुळे नाही चुकली."

"तुझ्यामुळेच चुकली. तुझ्या सखूताईने जेवणाला उशीर केला. तुझीच बहीण ती!"

" अरे, पण आल्याबरोबर भांडायला काय लागला ? " डॉक्टरांनी मित्रांचे गृहयुद्ध संपविले आणि डॉक्टरीणबाईंनी मनोरमाबाईंचे आगतस्वागत करून त्या फराळाच्या तयारीला लागल्या.

" बाकी एक दिवस उशीरा आलो म्हणून बिघडलं नाही काही. " शामराव म्हणाले.

" तुझं नाही बिघडलं " डॉक्टर सांगू लागले, " पण आमच्या गरीब बिचाऱ्या चिंगीला निष्कारण त्रास सोसावा लागला तुमच्या पायात. "

" म्हणजे ! " शामराव उद्गारले.

डॉक्टरांनी कालचा एकंदर प्रकार पाहुण्यांना निवेदन केला तेव्हा शामराव म्हणाले,

" नशीबवान आहेस तू डॉक्टर, असली धिटुकली छोकरी तुला लाभली. मी एकेकाची पोरं पाहातो, अनोळखी माणूस दिसला की दातखिळी बसलीच लेकाच्यांची. पुढे होऊन त्याला हटकायची गोष्ट दूरच राहली. "

" काल तुम्ही आला नाहीत भाऊजी म्हणून करताय हे कौतुक. तुम्हांला चावलं असतं हे कुत्रं म्हणजे समजलं असतं. "

डॉक्टरीणबाईंच्या ह्या बोलण्यात आपल्याकडून झालेली चूक छपवून ठेवण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत होता आणि चिंगीच्या होत असलेल्या कौतुकाबद्दलचे समाधानही दिसून येत होते.

विठ्ठलराव कंपाउंडर दवाखान्याच्या किल्ल्या मागायला म्हणून आले असले तरी गावात घडलेली भानगड डॉक्टर आणि मंडळींना सांगायची खरी उत्सुकता होती.

" रेगे वकिलांचं कळलंच असेल ? " कंपाउंडर.

" नाही बुवा. काय झालं ? " डॉक्टर.

" काल चांगला हात दाखवला भामट्यांनी त्यांना. "

" वकिलाला हात दाखवणारा म्हणजे इरसाल भामटा असला पाह्यजे तो. " शामराव.

" पण झालं काय ते सांगा तरी विठ्ठलराव ? " डॉक्टरीणबाई.

" काल दुपारी एक बुवा नि एक बाई घरी कुणी नाही, अशी संधी साधून रेग्याच्या बंगल्यात शिरली. पाव्हणे आलोय म्हणून त्यांनी हॉलमध्ये बैठक ठोकली. त्यांचा वशा नि माली तिथे खेळत होती, त्यांना खाऊचे पुडे दिले. वशाला आईला बोलवून आण म्हणून बाहेर धाडलं नि मालीला पाणी आणायसाठी आत पाठवलं. मुलं जाताच खुंटाळ्यावरले कपडे, कपाटातल्या नि टेबलावरल्या वस्तू गोळा करून झाली दोघं पसार! सगळा मिळून चार पाचशेचा ऐवज गेला असे रेगेच सांगत होते मला. "

विठ्ठलरावांनी ही हकिगत सांगताच चिंगी म्हणाली,

" रेग्याच्या मालीला माझ्यापरीस चांगलं वाचायला येतं म्हणून ऐटी दाखवते शाळेत, पण आता कशी झाली फजिती! "

" बरोबर आहे चिंगे. मुलांना नुसतं वाचायला येऊन भागायचं नाही. वेळप्रसंगी चावायलाही आलं पाह्यजे. चावण्याच्या तुझ्या पराक्रमामुळेच तू काल आपल्या बापाचा बचाव केलास. नाही तर त्या जोडीने वकिलाऐवजी डॉक्टरचीच शिकार केली असती. शाबास चिंगे. तुला बक्षीस दिलं पाह्यजे, होय की नाही डॉक्टर ? " शामराव म्हणाले. त्यावर डॉक्टरीणबाईंकडे पाहात आणि चिमटलेले गाल चोळीत चिंगी पुटपुटली,

" आई रगाड बक्षीस देती आम्हाला. "

" आता ही मला जन्मभर टोचत राहील. " डॉक्टरीणबाईंच्या ह्या बोलण्यावर सर्वजण हसू लागली.

# छोट्या पंढरीची यात्रा

वाटेल त्याला देव बनवायचा आणि वाटेल त्या ठिकाणाला क्षेत्र ठरवायचे आम्हाला छान साधते. तसे साधले नसते तर शेजारच्या इटाळी गावाला छोटी पंढरी असा मान कसा मिळाला असता ?

इटाळीची बायजाबाई डॉक्टरांचे औषध न्यायला यायची. परवा ती डॉक्टरीणबाईंना म्हणाली,

" बाई, आमच्या गावाला या की उद्यांच्या आखाडीला ! "

" ते कशाला ? काय आहे तिथे ? "

" अवो आमची इटाली मंजे साधं गाव नव्ह. विठ्ठली मंजे विठ्ठलाची न्हानगी पंडरी हाय ती ! आखाडी कातिकीला मट्टी जत्रा जमती. आट धा गावच्या पालख्या येत्यात. निवत्ती महाराजांचं गोपाळकाल्यापातुर कीर्तन चालतंय्. इकतं रोज न्हायाला सवड नसली तरी येऊन चंदरभागेची अंगुळ करून नि इठोबाला माळबुक्का घालून जात्यात माणसं. "

बायजाच्या बोलावण्याला शेजारच्या म्हाताऱ्या लक्षुंबाईंनी दुजोरा दिला. त्या म्हणाल्या,

"विठ्ठलीचं माहात्म खरंच मोठं आहे बरं का डाक्तरीणबाई. तुकोबा म्हणून एक माळकरी होता तिथे. जलमभर पायाने वारी केली त्याने पंढरपूरची. म्हातारपणी चालवेना नि वारी चुकणार म्हणून तो जीव द्यायला निघाला. तेव्हा पंढरपूरचा विठोबा सपनात द्रिश्टान्त दिऊन गेला, की 'तुझी ही इटाळी आषाढी कार्तिकीला विठ्ठली होईल नि इथल्याच नदीत चंद्रभागा येईल.' तेव्हापासन आलं ह्या इटाळीला महत्त्व. मागे मी दोन्ही एकादशांना जायची पण आता चालवतंय् कुठे?"

"मग लक्षुंकाकू, तुम्ही का नाही जीव द्यायला जात? तुम्ही जीव द्यायला निघालात तर विठोबा तुम्हालाही दृष्टान्त दील तुकोबासारखा, की 'तुमच्या घराची पंढरी नि तुमच्या आडाची चंद्रभागा होईल' म्हणून." चिंगी म्हणाली.

चिंगीच्या ह्या समयसूचक बोलण्याचे तिच्या आईला मनातून कौतुक वाटले, तरी लटक्या रागाने त्या म्हणाल्या, "मोठ्या माणसांच्या बोलण्यात तोंड घालू नये असं शंभरदा सांगितलं तरी तुझी खोड जात नाही. चालती हो बघू इथून."

चिंगी पुटपुटत बाहेर गेली.

आणि नंतर लक्षुंबाईंनी व बायजाने विठ्ठली यात्रेचे आणखी रसभरित वर्णन केले. त्याचा डॉक्टरीणबाईंच्या मनावर परिणाम झाला आणि ह्या आषाढीला विठ्ठलीला जायचेच असा त्यांचा निश्चय झाला. डॉक्टरीणबाईंच्या टांग्यातून लक्षुंबाईंनी यात्रे असे आमंत्रण त्यांना मिळाले.

डॉक्टरांनी प्रथम आढेवेढे घेतले, तेव्हा डॉक्टरीणबाईंनी अबोला, आदळआपट, बच्या चिंगीला निष्कारण धपाटे इत्यादि प्रयोग

डॉक्टरांना दाखवले. त्यासरशी त्यांनी आपला विरोध मागे घेतला आणि एकादशीच्या दिवशी उजाडायच्या आत त्यांच्या दारात रामू टांगा घेऊन हजर झाला. लक्ष्मुबाई आधीच हजर होत्या.

" चिंगे, खोलीतलं बोचकं टांग्यात नेऊन ठेव. "

आईची आज्ञा चिंगीने पाळली.

एका हातात करंडी आणि दुसऱ्या हातात तांब्या घेऊन डॉक्टरीणबाई आणि गवाळं खाकोटीला मारलेल्या लक्ष्मुबाई टांग्याकडे निघाल्या. बट्ट्याला कडेवर घेऊन चिंगीही निघाली.

टांगा चालू झाला. लक्ष्मुबाईंचे तोंडही सुरू झाले. निर्जळी एकादशी करून धाकट्या पंढरीची यात्रा केली म्हणजे माणूस वैकुंठाला जाते असे लक्ष्मुबाईंनी सांगताच चिंगीने म्हटले,

" निर्जळी एकादशी मंजे हो काय काकू ? "

" निर्जळी एकादशी मंजे तोंडात पाणी नाही घालायचं ! "

" मी करणार ग आई निर्जळी एकादशी. "

" आहे ठाऊक निर्जळी एकादशी करणारी. डबा चाटून पुसून खाल्लास तरी खा खा संपायची नाही तुझी. नि आधी काफी ढोसलीस ती ? "

" पण पाणी प्यायलंय् का सांग की ! बघ वाटलं तर सबंध दिवसभर पाणी तोंडात घालते का आज. बट्ट्याच्यातलं थोडं दूध दे मला नि घरी गेल्यावर सरबतच पीन मी. "

" बरं ग बाई. वटवट बंद कर तुझी. "

" नावेचीच पंचैती आहे डॉक्टरीणबाई. "

" नाव कुठली ? "

" मंजे काय विचारणं तुमचं ? चंद्रभागेतनं नावेत बसून जावं लागतं विठ्ठलेला. नि नावेत इतकी गर्दी नि रेटारेटी होते, की सांगून सोय नाही ! "

" मंजे त्रासच की हा. "

" पण करायचं काय ? पुन्य पाह्यजे तर त्रासही सोसलाच पायजे थोडासा. "

" तसं बरीक नाही हं काकू. काल डाक्तर म्हणत होते आईला, की घरच्या घरी बिनदगदगीने पुण्य जोडता येतं. पण आई ऐकूनच घेईना त्यांचं. "

चिंगीच्या पाठीत एक धबका बसला. आपले काय चुकले ते तिच्या ध्यानात येईना.

बोलूनचालून आषाढ महिना, पावसाळा. आतापर्यंत उघडीप होती हे नशीब. आता पाऊस सुरू झाला. किती आवरून घेतलं, आंग चोरून धरलं तरी त्याचा प्रसाद थोडाफार मिळालाच. थंडी वाजायला लागली. बाकीच्यांनी ती सहन केली. पण बब्यापुढे कुणाचे काय चालणार ? तो आंगावरले ओले कपडे पिसडून टाकायला लागला. पावसाची सर थांबेपर्यंत टांगा उभा करायला डॉक्टरीणबाईंनी सांगितले. एका मोठ्या झाडाखाली टांगा थांबला. डॉक्टरीणबाईंनी कोरडे कपडे काढण्यासाठी पुढे ठेवलेले बोचके उचलले आणि त्यांच्या तोंडून उद्‌गार निघाले,

" अगबाई ! हे काय ? केलानच शेवटी कार्टीने घोटाळा. "

आपले आणि मुलाचे कपडे बांधून ठेवलेले बोचके घरीच राहिले आणि यजमानांचे दवाखान्यातले ॲपरन्स आणि शोधनी बांधलेले गाठोडे चिंगीने टांग्यात ठेवले हे डॉक्टरीणबाईंना कळून चुकले !

चिंगीला भरपूर प्रसाद मिळाला हे सांगायला नकोच.

"खोलीतलं बोचकं टांग्यात ठेव म्हणताना मी ठेवलं. कोणतं बोचकं हे तू तरी सांगितलं होतंस वाटतं?" असा तिने उलट सवाल केला. पण आपली चूक कबूल करायच्या ऐवजी,

"वर मस्तवालपणाने बोलतीय कार्टी" असे म्हणून डॉक्टरीणबाईंनी चिंगीला आणखी दोन धपाटे घातले.

आता विठ्ठलीला जायचा बेत रहित करणे डॉक्टरीणबाईंना भाग पडले. आपले लुगडे चोळी आणि चिंगीचे परकर पोलके घरी राहिले, त्याच्या अभावी चंद्रभागेचे स्नान काही घडत नाही. स्नान नाही तर नाही, नुसत्या विठ्ठलदर्शनावरच भूक भागवून घ्यावी असे एकदा मनात आले त्यांच्या, पण त्या नादाला लागले तर प्रहरभर वेळ जाणार आणि आवश्यक कपड्यांअभावी डॉक्टरांच्या दवाखान्यातल्या



कामाची तेवढा वेळ खोटी होणार. त्याच्यापायी बोलून घ्यावे लागणार. त्यापेक्षा असेच्या असे घरी परत गेलेले बरे असे त्यांनी ठरवले. लक्षुंबाई मात्र परत न येता चालत विठ्ठलीला गेल्या.

'मेल्यांना जल्मात कधी देवाची आठवण व्हायची नाही, तर आताच कसं घडणार देवदर्शन' असे त्या परत फिरलेल्या टांग्याकडे पाहात पुटपुटल्या.

घरी येताच डॉक्टरांच्या थट्टेला ऊत आला व त्यामुळे डॉक्टरीणबाई रडकुंडीला आल्या. ह्याचा परिणाम चिंगीच्या गालावर व पाठीवर होणार हे ओळखून डॉक्टर तिला आपल्याबरोबर दवाखान्यात घेऊन गेले.

दुपारी डॉक्टर घरी येऊन फराळाला बसतात तो काही मंडळी घाबऱ्या घाबऱ्या येऊन म्हणाली,

"चला चला डॉक्टर. विठ्ठलीला अपघात झालाय नाव उलटून. शेकडो माणसं बुडालीत. काहींना वर काढलंय्, त्यांना वाचवता आलं तर वाचवायचंय्. आपल्या शेजारची म्हातारी ती लक्षुंबाई बुडलीय म्हणे."

ही हकिगत ऐकताच डॉक्टरीणबाईंच्या मनात आले, त्या म्हातारीसारखीच आपली गत झाली असती. बरं झालं चिंगीने हे केलं ते. त्यांनी चिंगीकडे कौतुकाने पाहिले आणि एक केळे सोलून तिच्या पानात टाकले.

# चिंगीचा पराक्रम

गोडशांच्या सुधाची मंगळागौर होती. गोडशीणबाईंची डॉक्टरीणबाईंशी चांगली गट्टी असल्यामुळे त्या सकाळपासून गोडशांच्या घरी गेल्या होत्या. आईबरोबर चिंगीला आमंत्रण असायचेच.

डॉक्टरीणबाई स्वयंपाकघरात मैत्रिणीला मदत करीत होत्या. चिंगी सुशीबरोबर फुले, पत्री जमविण्याच्या गडबडीत होती.


मंगळागौरीच्या जोडीला आज नागपंचमी आली होती. रात्री खूप पाऊस पडला होता. सकाळपासून नुसती बुरबुर चालू होती.

आंगणात पाणी साठले होते. गोडशांचा सोन्या आणि मोत्या कागदाच्या नावा साचलेल्या पाण्यावर सोडण्यात गर्क झाले होते. चिंगी आणि सुशी त्यांना जाऊन मिळाल्या.

नावांच्या खेळाने कंटाळल्यावर आंगणातली तळी रिकामी करण्याचा उद्योग मुलांनी सुरू केला. पसे भरभरून पाणी आंगण-भर फेकले जाऊ लागले. थोडे थोडेच पाणी होते ते पायांनी सारवले गेले. साहजिकच तेथे निसरडे झाले. त्याचा प्रसाद पूजेला आलेल्या वनितेला मिळाला !

ती श्रीमंताची मुलगी. जरीचा शालू नेसून आणि सोन्यामोत्याचे खूप दागिने घालून आली होती. पूजेच्या साहित्याचे चांदीचे तबक एका हातात आणि दुसऱ्या हातात फुलांची परडी असा तिचा थाट होता.

पण आंगणातील निसरड्यावर पाय निसरून वनितातांईने राडीत लोटांगण घातले! शालू खराब झाला आणि दागिन्यांवरही चिखलाचे शिंतोडे उडाले. पूजेचे तबक आणि फुलांची परडीही आंगणभर पसरली. दहा मंडळींच्या देखत आपली अशी शोभा झाल्यावर कोणत्या मुलीला रडू आल्याशिवाय राहील? अशा वेळी मनात मौज वाटत असली तरी मोठी माणसं हसू आवरून पोक्तपणाचा



आव आणतात. पण लहान मुलांना तसलं नाटक जमत नाही. कोणी पडलेले दिसले, की ती टाळ्या वाजवून खिदळायला लागतात.

आताही असेच झाले. वनितेची ती दुर्दशा बघताच, 'पाऊस पडला, भोपळा फुटला' असे घोकीत सुशी, सोन्या आणि मंडळी टाळ्या पिटू लागली.

गप्प बसा, चालती व्हा इथून, फाजील पोरटी, अशा वडील मंडळींच्या गर्जना ऐकून स्वयंपाकघरमाजघरातल्या बायका काय प्रकार आहे तो पाहायला बाहेर धावून आल्या.

खराब पाण्यात नाचताना चिंगीच्या नव्या परकरपोलक्यावरच नव्हे तर गालाकपाळावरही खडी निघाली होती, त्याबद्दल तर डॉक्टरीणबाईंना राग आलाच. पण वनितातार्इला लोटांगण घालायला लावण्यास चिंगीचीच करामत कारणीभूत झाली असली पाहिजे असा त्यांना वहीम आला. एखाद्याचे कानफाट्या नाव पडले, की प्रत्येक वेळी त्याच्यावरच आळ घ्यायची लोकांची रीतच असते.

डॉक्टरीणबाईंनी चिंगीच्या दंडाला धरून फरफरा ओढीत आणले आणि 'ही कार्टी कुठे गेली नि सुधेपणाने राहिली असं व्हायचंच नाही' असे कावत कदरत तिच्या पाठीत धपाटे घातले. जेवायची वेळ झाल्याशिवाय इकडे फिरकायचे नाही अशी ताकीद देऊन त्यांनी तिची घरी हकालपट्टी केली.

चिंगी रंजीस होऊन घरी गेली. पण तेथे तिला मौजेचा विषय मिळालाच. एक गारुड्याचा छोकरा करंडी घेऊन 'नागोबाला दूध द्या. पंचमीची ओवाळणी द्या,' म्हणत आला.

नागोबा देव आहे आणि नागपंचमीच्या दिवशी नागोबाचे दर्शन घेतल म्हणजे पुण्य लागते असे चिंगीने ऐकले होते. तिने गारुड्याला नागोबा दाखवायला सांगितले. नागोबाला तिने नमस्कार

केला आणि फडताळातून दूध आणून गारुड्याच्या वाटीत घातले. त्याने दक्षिणा मागितल्यावर पेन्सिलीसाठी मागून घेतलेला पैसाही त्याला देऊन टाकला.

" ए नागोबावाल्या, पलीकडल्या घरी आई आहे. तिला नागोबाचं दर्शन घ्यायचंय, तिकडे चल. ती दूध दिईल नि दक्षिणाही देईल. येतोस ? "

चिंगीची ही मागणी गारुडी कशाला नाकारील? तो चिंगीबरोबर गोडशांच्या घरी गेला.

चिंगी आत जाऊन म्हणाली, " आई ग, जंमत आणलीय तुला दाखवायला. अंगणात चल."

" मी नाही येत तुझी जंमत बघायला काम टाकून. तूच घेऊन बैस जा तुझी जंमत. "

आईने असे धुडकावले तरी नागपंचमीच्या दिवशी तिचे नागदर्शन अंतरणे चिंगीला प्रशस्त वाटेना. ती बाहेर आली. गारुड्याचा पोर करंडी पुढ्यात ठेवून पान खाण्याची तयारी करीत होता.

"हे वग किनई, आमची आई कामात आहे, ती बाहेर नाही येत. म्हणून मीच तिला नागोबा दाखवून आणते हं. " असे म्हणून चिंगीने त्याची टोपली उचलली सुद्धा.

" हां हां ! नगा हात लावू. नाग भैर पडल. " असे गारुडी ओरडू लागला. पण तिकडे लक्ष न देता चिंगीने आत धूम ठोकली.

माजघरात चांदीच्या चौरंगाभोवती आठदहा मुली मंगळागौर पुजीत होत्या. भटजी पूजा सांगत होते. चिंगीचे ते खटले दिसताच भटजी मंत्र थांबवून किंचाळले, " अरे बापरे ! काय करावं ह्या पोरटीला ! "

भटजीबरोबर मुलीही दचकून उठल्या व मग चिंगीही भेदरली. टोपली खाली पडली. नागोबा वळवळत बाहेर आले. मंगळागौर चौरंगावरच राहिली. पोथी पाटावरच्या पाटावर बसली. मुली किंचाळत सैरावैरा धावू लागल्या. भटजींची बोबडी वळली. तो गलका ऐकून सोप्यावरले पुरुष आणि स्वैपाकघरातल्या बायका धावून आल्या. पण फणा काढलेल्या नागोबाला पाहाताच त्यांचे पाय जागच्या जागी खिळले. सर्वांचे चेहेरे भीतीने पांढरे फटफटीत झाले.

चिंगी मात्र नागोबावर टोपलीचे झाकण घालण्याचा प्रयत्न निर्भयपणे करीत होती.

इतक्यात गारुडी आत घुसला आणि त्याने आपले जनावर आपल्या कबजात घेतले.

"आई, झालं ना तुला नागोबाचं दर्शन? नागपंचमी आहे आज." चिंगी म्हणाली.

ह्या असल्या पोरटीवर रागवावे की तिला हसावे हेच कोणाला कळेना!

# चिंगीचे सीमोल्लंघन

दसऱ्याच्या आदल्या रात्रीची गोष्ट. आमच्या गावी प्रो. विक्रम ह्यांच्या सर्कशीचा खेळ होता. उद्या दसऱ्याची सुटी असल्यामुळे आम्ही आणि डॉक्टरांनी सर्व मंडळीसह खेळ बघायला जायचे ठरविले होते. आमच्या ह्या बेतामुळे चिंगीचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. दिवे लागावयाच्या आधीपासून ती निघायची घाई करू लागली होती. साडेनवाला आम्ही डॉक्टरांनी आणलेल्या मोटारीतून तंबूवर गेलो.

विक्रम सर्कस खरोखरच प्रेक्षणीय होती व तिच्या लौकिकामुळे आजूबाजूचे लोकही खूप येत होते. शेकडो बैलगाड्या आणि दहावीस मोटार लॉऱ्या पटांगणापुढे सुटल्या होत्या.

खेळ सुरू झाला. पहिल्यांदा लाकडी रिफांच्या बुरुजावर सायकली पळविण्याचा कार्यक्रम झाला तो सर्वांनाच आवडला. सरळ जमिनीवर सायकल चालवताना विठ्ठलराव मास्तर पडतात आणि अशा वाकड्या तिकड्या पळवतांना हे सर्कसवाले का पडत नाहीत असे प्रश्न चिंगी विचारीत होती. खेळ बघण्यात गर्क झालेल्या डॉक्टरीणबाई ‘ गप्प बस ’ असे तिला दटावीत होत्या.

घोड्यावर, टेबलावर, शिडीवर चाललेल्या कसरतीतही मौज होती. चिंगी त्यांवर तर खूष होतीच, पण विदुषकाने खेळात चालवलेली गमतीदार लुडबुड पाहून तिची हसता हसता मुरकुंडी वळत होती.

त्या दिवशी कलेक्टरसाहेब खेळ पाहायला आले असल्यामुळे सर्कसवाले शेलकी कामे करून दाखवीत होते. मालक प्रो. विक्रम काळ्या कोटावर सोन्याचांदीची पदके लटकावून सिंहाचे काम घ्यायला आले, तेंव्हा चिंगीला सिंहापेक्षा त्यांचीच गंमत वाटली. ती आईला म्हणाली, " आपल्या डॉक्टरांनी सर्कस काढली तर त्यांनाही अशी छान पदकं मिळतील नाही ग आई ? मी सांगते त्यांना एक सर्कस काढायला. "

" पुरे ग " म्हणून डॉक्टरीणबाईंनी चिंगीला तिच्या खुर्चीवर दाबून बसविले.

खेळ पुरा होत आला. शेवटला झुल्याचा एक कार्यक्रम राहिला. त्यावेळी मालकांनी कलेक्टरसाहेबाला पानसुपारी केली. साहेबांच्या सन्मानार्थ त्यांनी लांबलचक भाषण केले. चिंगीला ते ऐकता ऐकता कंटाळा आला. ती पेंगायला लागली आणि आईला घरी जाऊ या म्हणून तगादा करायला लागली. डॉक्टरीणबाई खेळ पुरा झाल्यावाचून उठायला तयार नव्हत्या. त्या म्हणाल्या, " झोप यायला लागली तर नीज जाऊन गाडीत. "

चिंगी तंबूबाहेर गेली.

खेळ संपला. गर्दीतून आपल्या मोटारीपर्यंत पोचायला आम्हाला वीस पंचवीस मिनिटे थांबावे लागले. गर्दी ओसरल्यावर आम्ही गेलो. गाडीचे दार उघडताच डॉक्टरीणबाई ओरडल्या, " अगबाई चिंगी ! गाडीत झोपायला म्हणून ती मघाशीच उठून आली ! "

मग आमची धावपळ काय विचारता ! तंबूभोवती चार प्रदक्षिणा घालूनही चिंगीचा पत्ता लागला नाही ! तंबूतल्या बत्त्या विझल्यावर

आम्ही घरी परतलो. खेळ पाहून मन खुलले होते ते आता काळजीने उदास झाले. मंडळींना घरी पोचवून मी आणि डॉक्टर गावभर तिरपिटलो. कोठेच पोरीचा पत्ता लागेना. डॉक्टरीणबाई घरी रडत बसल्या होत्या. ही त्यांची समजूत घालीत होती. सारी रात्र आम्ही काय करायचे ह्या काळजीत जागून काढली.

उजाडले, आणि आजूबाजूच्या गावी चक्कर मारून यावे असा आमचा बेत सुरू झाला. एकदोन गावी आम्ही जाऊनही आलो पण पत्ता नाही !

गाडीत जाऊन झोप, अशी आईची आज्ञा मिळताच चिंगी तंबूबाहेर गेली आणि समोरच उभी असलेल्या एका मोटार लॉरीत ड्रायव्हरशेजारच्या जागी झोपली. ती लॉरी रामगावच्या इनामदारांच्या मुलामाणसांना घेऊन आली होती. खेळ संपल्यावर सगळी माणसे आली ही खात्री होताच ती रामगावला निघून गेली. एक मुलगी पुढे झोपली आहे, पण ती आपल्यांतलीच कोणीतरी असेल असे ड्रायव्हरला वाटले आणि अंधारात नीट निरखून पाहाण्याचे कष्ट कोणी घेतले नाहीत. घरी पोचल्यावर मात्र आपण दुसऱ्याच कोणाची मुलगी पळवून आणली असे त्यांना कळले आणि तिला आता तिच्या आईबापांकडे कशी पोचवायची हा इनामदारांना मोठा पेच पडला. त्यांनी चिंगीला जागी करून ती कोणाची कोण, हे विचारून घेण्याचा प्रयत्न केला. पण पोरीवर झोपेने इतका अंमल बसवला होता, की ती एका प्रश्नाचेही धड उत्तर देईना.

" बाळ, जागी हो बघू ? हां, उघड डोळे. तू कुणाची मुलगी ? " असे प्रश्न तिला दहादा तरी त्यांनी विचारले. पण डोळे उघडण्याऐवजी चिंगी ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळे. एकदा

फारच घुसळल्यावर ती म्हणाली, " रंगे, हे ग काय तुझं? आता मला त्रास देशील तर बाईंना सांगीन बघ."

तिच्यावरील हा झोपेचा अंमल बघून इनामदारीणबाई म्हणाल्या, "झोपू दे बिचारी. आता उजाडायला आलंच आहे. अंमळशाने अपाप जागी होईल. मग विचारून घेऊन पोचवायला येईल. आई काळजी करीत असेल. पण प्रहरभर काळजी केली तशी दोन प्रहर."

आठ वाजता चिंगी जागी झाली आणि अनोळखी जागी अनोळखी माणसे पाहून ती कावरीबावरी झाली. "तुम्ही कोण? आई कुठाय्?" तिने विचारले. तिचे डोळे पाण्याने डबडबले.

"भिऊ नको हं बाळ. तुझी आई नि बाबा इथेच आहेत. तू झोपलीवतीस म्हणून बाहेर गेलेत. आत्ता येतील."

"खोटं सांगताय् मला. बाबा आहेत तरी वाटतं! माझे बाबा डाक्तर आहेत. ते ह्या वेळी दवाखान्यात जातात. उगीच कुठेतरी नाही जात. नि आई त्यांच्याबरोबर कध्धी जात नाही सकाळी."

अशाच थोड्या बोलण्यावरून इनामदार मंडळींना कळून चुकले, की ही डॉक्टर सदानंदांची—आपल्या नेहमीच्या डॉक्टरांची—मुलगी चिंगी.

"आता तू आमच्या पुष्पाताईबरोबर खेळ, मजा कर." इनामदार म्हणाले.

"पण आई नि डाक्टर!" चिंगी गहिवरली.

"मी आता बोलावून आणतो त्यांना. जा, तू फराळ कर, खेळ. हा बघ मी निघालो."

इनामदारांच्या ह्या आपुलकीने चिंगीची भीती पळाली. ती पुष्पाताईबरोबर घरात गेली. एकमेकींच्या संगतीत दोघी रमल्या.



चिंगीचा ठावठिकाणा लागत नाही म्हणून आम्ही कपाळाला हात लावून बसलो होतो. दसऱ्याचा सणाचा दिवस. पण सुतकी कळा घरात पसरली होती. जेवणाचीही आठवण नव्हती कोणाला!

दुपारचे बारा वाजून गेले. दारात मोटार थांबली. वाटले कोणीतरी चिंगीला घेऊन आले. पण रामगावकर इनामदार पुढे येऊन उभे राहिले. दुःखाच्या वेळी ओळखीची माणसे आली तर आनंदापेक्षा उदासवाणेच वाटते. डॉक्टरनी त्या थोर माणसाचे स्वागत नेहमीच्या हसतमुखाने केले नाही.

"दसऱ्याचं सोनं द्यायला आलोय मी डॉक्टरसाहेब."

डॉक्टर गप्पच!

"पण इथे मी ते देणार नाही. आमच्या घरी आलं पाहिजे तुम्हाला."

"आज मी कुठे येऊ शकत नाही इनामदारसाहेब."

" खास येऊ शकाल. एकटेच नव्हे, तर बाई सुद्धा. चिंगीसाठी तुम्ही येणार नाही हे शक्य तरी कसं आहे ! "

" चिंगीसाठी ! ती तुमच्याकडे आहे ! " आम्ही सर्वजण उद्गारलो. इनामदारसाहेब म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर वाटले आम्हाला. त्यांच्याबरोबर आम्ही आनंदाने रामगावला गेलो.

दुपारचे दोन वाजून गेले तेथे पोचायला. चिंगीचे दर्शन झाले तेव्हा सारा शीण ओसरून गेला आणि इनामदारांच्या घरच्या मेजवानीवर आम्ही यथास्थित हात मारला.

" दसऱ्याचं सीमोल्लंघन म्हणजे ग काय आई ? " चिंगीने विचारले.

" तू आज केलं आहेस नि आम्हांलाही करायला लावलं आहेस तेच, " मी म्हणालो.

" पण असं नित्य व्हायला पाहिजे. चिंगीने दिवाळीलाही आलं पाहिजे असं पुष्पा म्हणतेय. " इनामदारीणबाई म्हणाल्या.

" नि ती माझ्याबरोबर आमच्या मुंबईच्या शाळेतही येऊ दे हो डॉक्टर. आमच्या बोर्डिंगात मज्जा मज्जा असते नि आमच्या बाई किती किती छान आहेत. " पुष्पा म्हणाली.

एखादे वेळी सहजगत्या बोललेली गोष्ट खरी ठरते त्याची मौज वाटते. चिंगी दिवाळीला तर इनामदारांकडे गेलीच, पण पुष्पाबरोबर तिला डॉक्टरांनी मुंबईलाही पाठवले.

आमची रोजची करमणूक आता दूर गेली.

समाप्त

IRBK-0116365
IRBK-0116365